बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार, दि.१३नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक९७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


## सरड्याची धाव कुंपणापर्यंत असते अगदी तसाच...

# सेटलमेंट बाबरी मुंडे?



खुनशी राजकारणामुळे चांगलं होतं नाही वाटोळंच होत!

जनता म्हणते, एवढा भरमसाठ पैसा नेमका आला कोठून

बाबरी मुंडेंला तमिळ चित्रपटात रोड शोचा रोल फरफेक्ट जमेल?

## मतदारांनो विश्वास ठेवू नका, त्याच्या वडिलांने बँक बुडविली!!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभाव जिव्हारी लागल्याने, बाबरी मुंडे माजलगाव मतदार संघात अपक्ष म्हणून निवडणूक लढवित आहेत.त्यांना नेमका कोणाचा करेक्ट कार्यक्रम लावायचा आहे? बाबरी मुंडे यांना उभा करणारी आणि रसद पुरविणारी अदृश्य व्यक्ती कोण? मतदार म्हणून आम्ही बाबरी मुंडेंना का मत द्यावे, ज्याच्या वडिलांने डीसीसी बँकेचे दिवाळे काढले? एवढे खुनशी राजकारण कशामुळे? कितीही कांगावा केला,रोडशो केले? त्याचा उपयोग काय? कारण सरड्याची धाव फक्त कुंपणापर्यंत असते. तसे पाहिले तर बाबरी मुंडे सेटलमेंट अपक्ष उमेदवार असून बँकेत ढापलेला पैसा तर उधळत नाहीत ना? अशाही चर्चा नागरिकांतून होत आहे. तसेच बाबरी मुंडे, उत्तम कलाकार असून त्यांना तमिळ चित्रपटात रोड शोचा अभिनय परफेक्ट जमेल अशा लोकभावना आहेत.

माजलगाव मतदार संघात निवडणूक लढविण्यासाठी बाबरी मुंडे अनेकांच्या दारात जावून आले.परंतू त्यांचा पान २ वर...

### गद्दार नेमकं कोण?

माजलगाव येथे रोडशोनंतर बाबरी मुंडे यांची, मोंढा भागात सभा झाली. त्यामध्ये त्यांनी माजलगाव मतदार संघात अनेक नेत्यांवर आरोप केले. लोकसभा निवडणुकीत गद्दारांमुळे पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. त्यांचा आम्ही या निवडणुकीत करेक्ट कार्यक्रम करु असे वक्तव्य केले. निवडणूकीत हारजीत होत राहते. पण बाबरी मुंडे सुद्धा गद्दारच आहेत आशा चर्चा लोकांमधून उमटत आहेत.



### ओबीसींनो बाबरी ऐवजी निर्मळ योग्य!

माजलगाव मतदार संघातील ओबीसी बांधवांनी चुकूनही बाबरी मुंडे यांना आपले अमूल्य मत देऊ नये. त्याऐवजी माधव निर्मळ यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून, त्यांना मताचा कौल द्यावा. अशी चर्चा होत आहे.

### बाबरी मुंडेंना नेमकं काय सिद्ध करायचं आहे?

माजलगाव येथील सभेत, बाबरी मुंडे म्हणले की, या विधानसभेला करेक्ट कार्यक्रम करायचा असा घनाघाती आरोप नाव न घेता बाबरी मुंडेंनी आ. प्रकाश सोळंके, मोहन जगताप, रमेश आडसकर ,माधव निर्मळ यांच्यावर केला.परंतू जर असे असेल तर बाबरी मुंडे यांना नेमकं काय सिद्ध करायचं आहे. असा प्रश निर्माण होतो.

## प्रदूषणकर्त्या देशांचे सर्वोच्च नेतेच परिषदेला अनुपस्थित

देशविदेश: हवामान समस्येवर गांभीर्याने चर्चा व्हावी



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक हवामान परिषदेला उपस्थित राहण्यासाठी जगभरातील नेत्यांचे अझरबैजानची राजधानी बाकू येथे आगमन होत आहे. मात्र, जगातील कार्बन डायऑक्साइडचे सर्वाधिक उत्सर्जन करणारे १३ देशांचे सर्वोच्च नेते परिषदेला अनुपस्थित असतील. त्यामुळे या परिषदेतून फारसे काही निष्पन्न होईल, अशी शक्यता नसल्याची प्रतिक्रिया तज्ज्ञांनी व्यक्त केली.जगामधील ७० टक्के कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन या १३ देशांत होते. सर्वाधिक प्रदूषण करणारा चीन आणि अमेरिकेचे प्रमुख परिषदेला उपस्थित राहणार नाहीत. जगातील ४२ टक्के लोकसंख्या ज्या चार देशांमध्ये एकवटली आहे, अशा चार देशांचे प्रतिनिधीही परिषदेमध्ये त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित नाहीत. हवामान शास्त्रज्ञ बिल हारे यांनी सांगितले, की राजकीय इच्छाशक्ती नसल्याचे हे लक्षण आहे. या प्रश्नाची तातडी असल्याची जाणीव कुणाला नाही. परिषदेमध्ये अझरबैजानचे अध्यक्ष इलहाम अलियेव्ह, ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टार्मर आणि तुर्कीचे अध्यक्ष रिसेप पान २ वर...

## रिपाइंची ताकद सोबत असल्याने विजय

रणधुमाळी: डॉ. योगेश क्षीरसागरांसाठी रिपाइंचा मेळावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंची (आठवले गट) ताकद सोबत असल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांचा विजय आजच निश्चित झाला आहे, असे प्रतिपादन रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले.बीडमध्ये महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, उप जिल्हाध्यक्ष बापू पवार, तालुकाध्यक्ष किशन तांगडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मायाताई मिसळे, प्रभाकर चांदणे, शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, महेश आठवले, सुभाष तांगडे, विलास जोगदंड, भैय्यासाहेब मस्के यांच्यासह रिपाइं, राष्ट्रवादी काँग्रेसचे महायुतीतील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून आणण्यासाठी रिपाइं आता मैदानात उतरली आहे. ज्या-ज्या वेळी रिपाइंने निवडणुकीची सूत्रे हाती घेतली. त्या-त्या वेळी विजय नक्की होतो. रिपाइंचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते पान २ वर...



### पप्पू कागदे यांना योग्य स्थान मिळेल-डॉ.योगेश क्षीरसागर

रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना भविष्यात योग्य स्थान मिळेल. त्यासाठी महायुतीच्या सर्व प्रमुख नेत्यांकडे मागणी आणि विनंती करेल. क्षीरसागर परिवार हे कायमच विकासाच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण करत आले. समाजातील छोट्या छोट्या घटकांना न्याय देण्याचं काम करत आलो. नगरपालिकेच्या माध्यमातून शहरात भीमसृष्टी उभी केली. अनेक ठिकाणी बौद्ध विहार उभारले. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची यांची आणि व्याप्ती वाढावी यासाठी पाठपुरावा करू. रिपाइंच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना माझ्याकडून सन्मानाची वागणूक मिळेल. पुढच्या काळात रिपाइंला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान वाटा नक्कीच मिळेल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.



## ठाकरेंच्या हातून पैसा सुटत नाही, बॅगेत काय असणार?

चर्चेतले: राज ठाकरेंची खोचक टीका!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोर धरू लागला आहे. ठिकठिकाणी राजकीय नेत्यांच्या प्रचारसभा आयोजित केल्या जात आहेत. अशातच या प्रचारसभेला जात असताना सलग दोन दिवस उद्धव ठाकरे यांची बॅग तपासण्यात आली आहे. यावरून आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही यावरून उद्धव ठाकरे यांच्यावर खोचक टीका केली आहे. भांडूपमधील सभेत बोलताना त्यांनी यासंदर्भात भाष्य केलं.काल आणि आज उद्धव ठाकरेंची बॅग तपासली. खरं तर निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना कुठं काय तपासावं हेसुद्धा कळत नाही. ज्या व्यक्तीच्या हातातून कधी पैसे सुटला नाही, त्या व्यक्तीच्या बॅगेत काय असणार आहे? फार फार तर हात रुमाल आणि कोमट पाणी, याशिवाय दुसरं काहीही असू शकत नाही, अशी खोचक टीका राज ठाकरे यांनी केली.पुढे बोलताना ते पान २ वर...

सभेला उपस्थित रहावे | राजेंद्र मोटे, बाळासाहेब मस्के, जयदीप गोल्हार

# गेवराईत राज ठाकरेंची तोफ धडाडणार

## मयुरी मस्के-खेडकरांच्या विजयासाठी सभा



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई येथे मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांची दि.१४ नोव्हेंबर २०२४ रोजी तोफ धडाडणार आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत उमेदवार मयुरी मस्के-खेडकर यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेतून मयुरीताई मस्के-खेडकर यांच्या विजयावर शिक्कामोर्तब होणार असून या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन मनसेचे बीड जिल्हा प्रमुख राजेंद्र मोटे, बी. एम. प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब मस्के, उपजिल्हा प्रमुख नीलकंठ वखरे, मनसेचे गेवराई तालुका प्रमुख जयदीप गोल्हार यांनी केले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. महायुती तसेच महाविकास आघाडीचे प्रस्थापित उमेदवार समोर उभा असताना मनसेच्या मयुरी मस्के यांनी तालुक्यात तगडी प्रचार यंत्रणा राबवून प्रस्थापित विरोधकांना तगडे आव्हान उभे केले आहे. सध्या मयुरी मस्के यांचा तालुक्यात झंझावात सुरु असून मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. दरम्यान त्यांच्या प्रचारासाठी स्वतः मनसेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे हे येणार असून दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता गेवराई शहरातील आठवडी बाजार मैदान, दत्त मंदिर समोर येथे त्यांची जाहीर सभा होणार आहे. राज ठाकरे यांचे हेलिकॉप्टरने शहरातील क्रीडा संकुलावर आगमन होणार असून यानंतर ते सभास्थळी येणार आहेत. या सभेला मनसेचे बीड जिल्हा प्रभारी सलीम मामा शेख, बीड जिल्हा प्रभारी नरेंद्र तांबोळी आदींसह काही पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान मयुरी मस्के-खेडकर यांच्या विजयावर शिक्का मोर्तब करण्यासाठी मनसेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या होणाऱ्या या जाहीर सभेला गेवराई मतदार संघातील मतदार व नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, बी.एम.प्रतिष्ठाणचे पान २ वर...

## 'यूपीपीएससी' परीक्षार्थींची निदर्शने

आक्रमक: दोन परीक्षा एकाच दिवशी घेण्यासाठी आंदोलन




दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रयागराज : उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगातर्फे (यूपीपीएससी) आयोजित केल्या जाणाऱ्या छाननी अधिकारी-सहाय्यक छाननी अधिकारी (आरओ-एआरओ) आणि राज्य नागरी सेवा (पीसीएस) या परीक्षा वेगवेगळ्या दिवशी घेतल्या जात असून त्या एकाच दिवशी घ्याव्यात या मागणीसाठी प्रयागराज येथील उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयाबाहेर सोमवारपासून निदर्शने सुरू आहेत. मंगळवारीही ही निदर्शने सुरू राहिली.परीक्षांच्या तारखा बदलण्याच्या मागणीसाठी परीक्षार्थींनी सोमवारी 'यूपीपीएससी' मुख्यालयाला घेराव घातल्यानंतर मंगळवारी धरणे आंदोलन करण्यात आले. त्यांना पांगवण्यासाठी मोठ्या प्रमाणात राज्य पोलीस तैनात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांसंबंधी जिल्हा न्यायदंडाधिकारी आणि पोलीस आयुक्तांनी सोमवारी उशिरा त्यांच्याबरोबर पान २ वर...

## सरन्यायाधीशांस, सप्रेम

ज्या देशात प्रलंबित वा न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या लाखाच्या घरात आहे त्या देशात एखादा सरन्यायाधीश निवृत्त होताना त्याने दिलेल्या निकालांपेक्षा न दिलेल्या निकालांचीच संख्या अधिक असणार हे स्पष्ट आहे. तरीही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची निवृत्ती अनेक अर्थांनी– त्यांनी दिलेल्या तसेच न दिलेल्याही– निकालांचा विचार करताना महत्त्वाची ठरते. त्यावर भाष्य करण्याआधी न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश झाले ती पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. दांडग्या बहुमताने सत्तेवर आलेले सरकार सामाजिक बहुमतवादाचा पुरस्कार करत असताना, लोकशाहीतील तीन स्तंभांपैकी प्रशासनाचा स्तंभ अधिकाधिक बळकट होत असताना, सरकारी आणि घटनात्मक यंत्रणा एकापाठोपाठ एक नांग्या टाकत असताना आणि या सगळ्यांमुळे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत होत असताना न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश बनले. ज्या समाजात समानता हे तत्त्व नैसर्गिक नाही त्या समाजात सामाजिक, लैंगिक समानतेचा आदर करणारी व्यक्ती सरन्यायाधीश होणे आश्वासक होते. आणि म्हणून आपल्या निवाड्यांतून हा समानतेचा आग्रह ते कितपत राबवू शकतात हे पाहणे कुतूहलाचे ठरणार होते. न्या. चंद्रचूड यांच्याआधी एन व्ही रमण्णा आणि मराठमोळे उदय लळित यांच्या काळात सरन्यायाधीश काय करू शकतात याची चुणूक दिसली होती आणि त्यामुळेही न्या. चंद्रचूड यांच्याबाबतचा आशावाद अधिक प्रबळ होता. भारतीय संस्कृतीइतकीच पाश्चात्त्यांची उच्च सांस्कृतिक मूल्ये अंगी बाणलेली, उदारमतवादाचा आणि विविधतेतील एकतेचा सक्रिय पुरस्कार करणारी व्यक्ती सर्वोच्च न्यायिक अधिकारपदी आरूढ होते ही बाब आशा जागवणारी होती. हा आशावाद किती सार्थ, किती अनाठायी ठरला याचा हिशेब त्यांच्या निवृत्तीसमयी मांडणे आवश्यक ठरते. तसा तो मांडत असताना एक वास्तविकता विसरून चालणार नाही. ते म्हणजे आपल्यासारख्या व्यक्तिकेंद्री देशात एकच एकास नायकपद देऊन त्याने सर्वांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असे मानणे हा बालिशपणा ठरेल. तो टाळून न्या. चंद्रचूड यांच्या कार्यसिद्धीचा हा हिशेब.न्या. चंद्रचूड यांना सरन्यायाधीशपदी दोन वर्षे मिळाली. ही बाब दुर्मीळ. या आधी इतका कालावधी न्या. सरोश होमी कपाडिया यांना मिळाला. ते २०१० ते २०१२ या काळात सरन्यायाधीश होते. त्या काळात न्या. कपाडिया यांनी स्वत: २७ प्रकरणी निकाल लेखन केले. न्या. चंद्रचूड यांनी लिहिलेल्या न्यायादेशांची संख्या ९२ आहे. चंद्रचूड यांच्याआधीच्या चार सरन्यायाधीशांनी दिलेल्या निकालांची बेरीज जरी केली तरी तीपेक्षा न्या. चंद्रचूड यांच्या निकालांची संख्या अधिक भरेल. 'लोकसत्ता लेक्चर'चे उद्घाटन करताना त्यांनी त्यांच्या काळात सर्वोच्च न्यायालयाकडून झालेल्या एकंदर सुनावण्यांचा तपशील दिला. ती संख्या लाखापेक्षा अधिक आहे. यावरून त्यांच्या 'कार्यव्यसनाधीनतेचा' (वर्को होलिक) परिचय होईल. ही झाली केवळ संख्यात्मक बाब. न्या. चंद्रचूड यांनी निकालात काढलेली अनेक प्रकरणे ही अर्थातच घटनात्मक वा घटनेशी संबंधित आहेत. भारतीय घटना हा चंद्रचूड यांच्या जिव्हाळ्याचा विषय. अन्य कोणत्याही प्रकरणांपेक्षा घटनात्मक प्रकरणे हाताळणे हे अधिक जिकिरीचे आणि आव्हानात्मक. कारण या प्रकरणातील निकाल हा एका अर्थी कायदा बनतो आणि पुढील अनेक पिढ्यांसाठी तो परिणामकारक ठरतो. न्या. चंद्रचूड यांनी दिलेले अनेक निकाल त्यामुळे घटनात्मकता, समानता संघराज्यवाद आणि निधर्मिकता या मुद्द्यावर मैलाचा दगड ठरले. महिलांना मंदिरात प्रवेश देणारा, खनिज आणि औद्योगिक अल्कोहोल उत्पन्नावर राज्यांना अधिकार बहाल करणारा, तुरुंगातील जातप्रथा नष्ट करणारा इत्यादी निकालांचा दाखला देता येईल. हे सर्व विषय तांत्रिक. जनसामान्यांच्या विचारकक्षेबाहेरचे. पण देशात अपेक्षित असलेला 'सहकारी संघराज्यवाद' (कोऑपरेटिव्ह फेडरिलझम) प्रत्यक्षात उतरवण्यासाठी या निकालांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे सर्व निर्णय विस्तारवादी केंद्र सरकारच्या विरोधात जाणारे आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय. तथापि 'भक्त'संप्रदाय वगळता सर्वसामान्यांस न्या. चंद्रचूड लक्षात राहतील ते निवडणूक रोख्यांबाबतच्या निर्णयासाठी. निकाल म्हणून त्याचे महत्त्व किती हे नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचा आहे या निकालात सरन्यायाधीशांनी दाखवून दिलेला 'पारदर्शकतेतील समानता' हा निकष. सत्तापदी असलेले आणि नसलेले यांची पारदर्शकता भिन्न असू शकत नाही हे या निकालामागील तत्त्व दूरगामी परिणामकारक ठरेल. 'न्यायिक करुणा' हा न्यायालयीन निकालात क्वचित आढळणारा गुणही न्या. चंद्रचूड यांच्या अनेक निकालांतून दिसतो. एका दलित विद्यार्थ्यास अगदी क्षुल्लक कारणाने आयआयटीत नाकारल्या गेलेल्या प्रवेशाचा मुद्दा वा अपंगांबाबतचे त्यांचे निर्णय यातून या करुणेचे दर्शन घडते. तथापि अयोध्याप्रकरणी निकालाआधी परमेश्वराला साकडे घातले असे म्हणताना वा पंतप्रधानांच्या समवेत कॅमेऱ्यांच्या साक्षीने गणेशारती करतानाही त्यांस या पाश्चात्त्य संस्कृतीने रोखले असते तर अधिक बरे झाले असते. सरन्यायाधीशांसही धर्मपालनाचा अधिकार आहे हे खरे. पण त्याचे असे प्रदर्शन आपल्या अनुकरणीय समाजात कितपत योग्य हा प्रश्न. तसेच सत्ताधीशांस भेटल्यामुळे न्यायिक प्रक्रियेवर काहीही परिणाम होत नाही, हे त्यांचे प्रतिपादन खरे. पण सत्ताधीशांशी संबंधित काही प्रकरणांत नेमकी ही न्यायिक प्रक्रिया कशी काय बुवा लांबते असा प्रश्न सर्वसामान्यांस पडत असल्यास तोही तितकाच खरा. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्याबाबत तो पडला नसता तर त्यांची कारकीर्द अधिक देदीप्यमान ठरली असती. हे नमूद करताना कोणाही मर्त्य मानवातील अपूर्णता त्याच्या पूर्णत्वाच्या ध्यासास मोहक बनवत असते हे सत्य लक्षात घ्यावे लागेल. ही पूर्णत्वाची ओढ प्रामाणिक हवी. न्या. धनंजय चंद्रचूड यांची ती होती हे त्यांचे कडवे टीकाकारही अमान्य करणार नाहीत. न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याच्या त्यांच्या निर्णयातून हीच प्रामाणिकता दिसून येते. रसाळ भाषा, उच्च कोटीची बुद्धिमत्ता आणि लोभस तर्कवाद या त्यांच्या गुणांनी क्वचितच कोणा न्यायाधीशास मिळणारी लोकप्रियता त्यांना मिळाली.

# कुलूप लावण्याचा पराक्रम केला

## राजेसाहेब देशमुख :गावा-गावात जाऊन मतदारांशी साधला संवाद

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे, पंकजा मुंडे यांच्या प्रयत्नाने अनेक वेळा परळी विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पीक विमा मिळाला. पण २०१९ च्या निवडणुकीनंतर 2020 ला बजाज अलायन्स पिक विमा कंपनी कृषिमंत्र्यांनी आणली. प्रति हेक्टर १३,५०० पिक विमा मंजूर झालेला असतानाही शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला नाही. अनुदान, अग्रीम रक्कम मिळाली नाही. महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या. कृषिमंत्री असूनही धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळविला. एवढेच नाही तर परळी विधानसभा मतदारसंघातील तिन्ही कारखान्यांसह इतर संस्थांना कुलूप लावण्याचा पराक्रम त्यांनी केला आहे. निष्क्रिय कृषीमंत्री मत मागायला आले तर त्यांना मतदारांनी याचा जाब विचारावा असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू- भगिनींना विविध ठिकाणी संवाद साधताना केले आहे.

यावेळी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यासह किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. अजय बुरांडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे, काँग्रेसचे परळी तालुका अध्यक्ष अनिल जाधव, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे सिरसाळा शहर प्रमुख संतोष सुरवसे, ॲड. शिंदे, रमेश कडबाने, माणिक कडबाने, पिंपरी सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य गोविंदराव काळे, मंगेश कडबाने, नितीन कडबाने, महादेव गंगणे, सुधाकर गंगणे, अक्षय कडबाने, भुजंग कडबाने, प्रल्हाद शिंदे, अब्बास पठाण, शेख फिरोज, रोहिदास निर्मळ आदिसह मलनाथपुर- भिलेगाव-वाघाळा-गोपाळपूर-वडखेल-तडोळी-माळहिवरा-मांडखेल गावातील मतदार बंधू-भगिनीसह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.



### परळी राज्यातील पहिला मतदारसंघ

परळी विधानसभा मतदारसंघात असलेल्या तिन्ही कारखान्यांना बंद पाडण्याचे कारस्थान कृषिमंत्र्यांनी केल आहे. तीन कारखाने बंद पडलेला परळी विधानसभा मतदारसंघ हा राज्यातील एकमेव मतदार संघ आहे कारण कृषी मंत्री जेथे जातात तिथे कुलूपच लावून येतात. तसेच इतरही उद्योग त्यांनी बंद पाडून सर्वत्र मतदारसंघात बेकारांची फौज निर्माण केली आहे. मंत्री महोदयांनी बेरोजगार युवकासाठी एकही प्रकल्प मतदार संघात आणला नाही. विकासाच राजकारण करण्याऐवजी गुंडागर्दी, दडपशाहीचे राजकारण केल आहे. आजही भिलेगाव, वडखेल, वाघाळा परिसरात नागरिकांना रस्ते, नाल्या, वीज आदी सुविधासाठी झगडावे लागते. कोट्यावधी रुपयेचा निधी आणूनही हा भाग कायम विकासापासून जाणीवपूर्वक ठेवला आहे. याचा वचपा या भागातील मतदार बंधू-भगिनी येत्या २० तारखेला महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना मतदान करून काढावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे यांनी केले.

### महायुतीचे सरकार शेतकरी विरोधी!

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव नाही, सोयाबीनचा पिक विमा नाही, अग्रीम रक्कम दिली नाही, अनुदान दिले नाही. या प्रश्नावर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आवाज उठवण्याचे किसान सभेच्या माध्यमातून आम्ही वेळोवेळी केले आहे. परंतु हा आवाज दाबण्याचा प्रयत्न या भागातील लोकप्रतिनिधींनी केला. केवळ जाती आणि धर्माच्या नावावर मते मागण्याचे कटकारस्थान चालू आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढे भारणार्या पक्षांना लोकांना हे शेतकऱ्यांच्या प्रश्नी कसे एकत्र येणार नाहीत. यासाठी भाजपा सरकारने प्रयत्न केले. भाजप व महायुतीचे सरकार हे शेतकरी विरोधी असल्याचा आरोप किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. अजय बुरांडे यांनी यावेळी केला.

## पान एक वरून

**सरड्याची धाव कुंपणापर्यंत**

खुनशी हेतू पाहता कोणत्याही पक्षाने उमेदवारी दिली नाही. शेवटी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उभा राहीले आहेत. खरंतर पंकजा मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागला म्हणून करेक्ट कार्यक्रम लावण्यासाठी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पण त्याचा काहीही फायदा होणार नाही. कारण या खुनशी राजकारणाचा सर्वाधिक फटका बाबरी मुंडे यांनाच बसणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यावर खापर फोडणारे बाबरी मुंडे राजकारणात किती अल्प बुद्धिमान आहेत, असेच म्हणावे लागेल. महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज असेल तर ही एकप्रकारे गद्दारीच आहे. प्रकाश सोळंके कोणाला जड झाले आहेत, बाबरी मुंडेंना की आणखीन कोणाला याचा, जनता विचार करु लागली आहे. त्यामुळे डिपॉझिट जप्त होण्याचा करेक्ट कार्यक्रम बाबरी मुंडे यांचाचं लागू नये? या चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान बाबरी मुंडे यांचे वडील राजाभाऊ मुंडे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कसे दिवाळी काढले. याचा इतिहास मतदारांनी वाचून ज्याला त्याची जागा दाखवून द्यावी.अशा संतप्त प्रतिक्रिया लोक व्यक्त करू लागले आहेत.

**प्रदूषणकर्त्या देशांचे सर्वोच्च**

तय्यीप अर्दोगन प्रथम परिषदेमध्ये बोलणार आहेत. हवामान बदलाचा फटका बसू शकतील, असे देश आणि अनेक छोट्या देशांचे प्रमुख, आफ्रिकेतील विविध देशांचे प्रतिनिधी परिषदेला उपस्थित आहेत. दरम्यान, या परिषेदत पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांनी विकसित देशांकडून विकसनशील देशांना दर वर्षी एक ट्रिलियन डॉलर निधी देण्याची मागणी केली आहे. तसेच, हवामान बदलासंदर्भात अधिक जबाबदारी, आर्थिक पॅकेज आणि विकसित देशांकडून पारदर्शी डेटा उपलब्ध व्हावा, अशीही मागणी केली आहे.इंटर अमेरिकन डेव्हलपमेंट बँकेच्या अध्यक्षांचे हवामान बदलावरील विशेष सल्लागार अविनाश परसौद यांनी हवामान बदलांचा सामना करण्यासाठी आवश्यक आर्थिक निधीची मोठी गरज असल्याचे सांगितले. पारदर्शी व्यवहार, निश्चित जबाबदारीवरही त्यांनी भाष्य केले. वाहनिंगन विद्यापीठाच्या डॉ. आरती गुप्ता यांनीही हाच मुद्दा उपस्थित केला. तसेच, हवामान बदलाविषयी आर्थिक पॅकेजच्या डेटाची पडताळणी नीट होत नसल्याबद्दलही खंत व्यक्त केली.

**रिपाइंची ताकद सोबत**

हे एकनिष्ठ राहून काम करणार आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर हे सुशिक्षित, शांत, संयमी युवा नेतृत्व आहे. त्यांना विधानसभेत पाठवण्याची जबाबदारी आता आपली आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून आणण्यासाठी रिपाइंच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदारसंघातील सर्व भागात जाऊन प्रचार करण्याचे आदेश या मेळाव्यातून दिले. यावेळी पप्पू कागदे यांनी येत्या २० तारखेला डॉ.योगेश क्षीरसागर यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने गर्दी होती.

**ठाकरेंच्या हातून पैसा सुटत**

म्हणाले, की उद्धव ठाकरेंची बॅग तपासल्यानंतर आता त्याचा मोठा बाऊ केला जातो आहे. मुळात बॅग तपासण्यात गैर काय? अनेकदा आमच्याही बॅगा तपासण्यात आल्या. निवडणूक अधिकारी त्यांचं काम करत असतात. त्याचा एवढा तमाशा करायची गरजं नाही. त्यातही ते संबंधित अधिकाऱ्यांचा व्हिडीओ काढतात. त्याला नियुक्त पत्र दाखवायला सांगतात, मुळात कोणताही अधिकारी नियुक्ती पत्र घेऊन फिरतो का? कुणाला काय विचारावं, हेही उद्धव ठाकरेंना माहिती नाही. त्यांना फक्त मुख्यमंत्रीपद हवं आहे. या लोकांनी सगळा तमाशा करून ठेवला आहे, अशी टीकाही राज ठाकरे यांनी केली.दरम्यान, महाविकास आघाडीचे औसा विधानसभेचे अधिकृत उमेदवार दिनकर माने यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेला जाताना आज उद्धव ठाकरेंच्या हेलिकॉप्टरची झाडाझडती घेण्यात आली. उद्धव ठाकरेंनीही सामानाची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी केली. त्यांचं नाव, त्यांचं नियुक्त पत्रक, एवढंच नव्हे तर त्यांच्या खिशातील पाकिटात किती पैसे आहेत, याचीही विचारणा केली. तत्पूर्वी काल वणी येथे उमेदवाराच्या प्रचाराला जात असतानाही त्यांच्या बॅगची तपासणी करण्यात आली होती. यावरून उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त केला होता. माझ्या बॅगची जशी तपासणी केली, तशी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार किंवा पंतप्रधान मोदी यांच्या बॅगांची तपासणी करणार का? असा प्रश्न त्यांनी अधिकाऱ्यांना विचारला होता.

**गेवराईत राज ठाकरेंची**

अध्यक्ष बाळासाहेब मस्के, उपजिल्हा प्रमुख नीलकंठ वखरे, गेवराई तालुकाध्यक्ष जयदीप गोल्हार, कृष्णा राठोड, विकी चव्हाण, शुभम मेहत्रे, नितीन राठोड, राहुल जाधव, नागेश शिंदे आदींनी केले आहे.

**'यूपीपीएससी' परीक्षार्थींची**

बैठक घेतली. पण ती निष्फळ ठरली. त्यानंतर बहुसंख्य परीक्षार्थी निदर्शकांनी आंदोलनस्थळी उघड्यावर रात्र काढली. तर जे रात्री घरी गेले होते ते मंगळवारी सकाळी आयोगाच्या प्रवेशद्वाराजवळ पुन्हा जमले. यावेळी विद्यार्थ्यांनी 'आम्ही माघार घेणार नाही, न्याय मिळेपर्यंत एक राहू', 'एक दिवस, एक परीक्षा' यासारख्या घोषणा लिहिलेले फलक झळकावले.दरम्यान, समाजवादी पक्ष आणि काँग्रेसने राज्य सरकारवर टीका केली आहे. निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करणे दुर्दैवी असल्याचे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटले आहे. तर, राज्य लोकसेवा आयोगाने या परीक्षार्थींचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली. दुसरीकडे, परीक्षांचे पावित्र्य कायम ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे आयोगाच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

**भाजपच्या पराभवानंतरच रोजगारनिर्मिती शक्य!**

: भाजप सत्तेवरून पायउतार झाल्यावरच नोकऱ्यांची निर्मिती होऊ शकेल अशी टीका राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केली आहे. ''भाजप सरकार ज्या उत्साहाने अन्यायाचा बुलडोझर चालवत आहे त्याच उत्साहाने त्यांनी कारभार केला असता तर ही वेळ आली नसती,'' अशी टीका त्यांनी केली. अनेक वर्षे एकतर पदांची निर्मिती केली गेली नाही किंवा परीक्षा प्रक्रिया लांबवण्यात आली असे यादव यांनी 'एक्स'वर लिहिले आहे.

## पान सहा वरून

**एकजूटनेच विजयाचा गुलाल...**आता आपल्या सर्व सहकाऱ्यांची एकजूट नक्कीच विजयाकडे घेऊन जाणारी आहे. त्यामुळे विरोधकांनी कितीही उठाठेव केली तरी त्यांना सुज्ञ स्वाभिमानी मतदार थारा देणार नाहीत. विरोधक माझ्यावर टिका करण्यात धन्यता मानत आहेत परंतु त्यांनी कितीही आरोप केले तरी मतदारसंघातील जनता तुम्हाला योग्य ती जागा दाखवतील अशा शब्दात आ.संदीप क्षीरसागर यांनी विरोधकांना खडेबोल सुनावले. तसेच आपला विजय निश्चित असून आता फक्त मताधिक्य वाढवण्यासाठी सर्व मित्र मंडळ व सहकाऱ्यांनी येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस अनुक्रमांक ३ समोरील बटन दाबून सर्वांनी प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.यावेळी त्यांनी गत पाच वर्षात आमदारकीच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला.आम्ही विकासासाठी काम करतो.विरोधकावरही टिका करताना संयम बाळगतो असेही ते म्हणाले.

**दिंद्रुडमध्ये कर्जबाजारी....**पंचनामा करून प्रेत शवविच्छेद करण्यासाठी माजलगाव येथे पाठवले. काशिनाथ किसन ठोंबरे वय ४२ वर्ष असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. रविवारी रात्री घरी जेवण करून दिंद्रुड शिवारातील गट नंबर ४२ मध्ये असलेल्या शेतात ते काही कामानिमित्त गेले होते. दरम्यान सोमवारी सकाळी शेजारील शेतकऱ्यास त्यांचा मृतदेह चिंचाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. मयत काशिनाथ हे गेल्या काही दिवसांपासून कर्जबाजारी असल्याने कर्जाचे व्याज व पैसे फेडू कसे? या चिंतेत असल्याचे कुटुंबीय सांगतात. सोमवारी सायंकाळी मयत काशिनाथ यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान त्यांच्या पश्चात वयोवृद्ध आई,पत्नी, एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.

**अनिलदादा जगतापांचा शिवसेनेला**

जय महाराष्ट्र ठोकून माझ्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देत आहोत. असे अनिलदादा जगताप यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केले. इथून पुढे मला मानणारी सर्व जाती धर्मातील जनताच माझी नेता आणि सन्मानीय मनोजदादा जरांगे पाटील हाच पक्ष आहे. मी बीड विधानसभेचा अपक्ष उमेदवार असून माझा विजय निश्चित होणार आहे आणि मी विजयी झाल्यानंतर कोणत्याच पक्षात जाणार नाही व कोणत्याच पक्षातील नेत्याला मानणार नाही. असे शिवसेनेला वैतागलेल्या अनिलदादा यांनी पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले. अनिलदादा जगताप यांनी आज दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्याला कार्यलयात पत्रकार परिषद घेत शिवसेनेकडून झालेल्या अन्यायाला वैतागून आपल्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिला. याबरोबरच बीड शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी देखील आपला राजीनामा दिला असल्याचे अनिलदादा यांनी स्पष्ट केले.

**नमीता लोखंडेंचे दुकान....**चिंचोली येथील नागरिकांना पडला आहे . तसेच विद्यमान आमदारांनी आहे त्या सबस्टेशनची दुरूस्ती करु शकत नाही तर नवीन सबस्टेशन काय उभारणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तरी विद्यमान आमदार यांच्या मतदार संघात चिंचोली माळी गाव येत नाही असाही प्रश्न चिंचोली माळी येथील नागरिकांना पडला आहे.

**केजमध्ये वाळु माफीयांचा**

ब्रास वाळूची चोरलेला दिसून येत आहे. दुसरीकडे वाळू माफिया यांचे अच्छे दिन आलेले दिसत आहे. त्यामुळे महसूल व पोलीस प्रशासन यांचे दुर्लक्ष दिसून येत आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव नदी पात्रामध्ये अवैध रीतीने ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा कधी थांबणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे. तर दुसरीकडे वाळू माफिया रात्रीच्या वेळी धुमाकूळ सुरू आहे.यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन अवैध रीतीने वाळू चालणाऱ्या ट्रॅक्टरवरून मालकावर कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफ्याच्या दावणीला आहे का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे.तरी उत्रेश्वरपींप्री व बोरगाव काळेगाव नदी परीसरातील वाळू उपसा बंद करण्यात यावा अशी मागणी नागरिकांन मधुन व्यक्त केली आहे.

**कुटुंबाच्या पलीकडे सत्ता जाऊच**

उडी जाऊच शकत नाही असे ते जातिवंत जातियवादी आहेत. चार वेळा बहुजनांनी जयदत्त क्षीरसागर यांना विधानसभेत पाठविले याचा विसर त्यांना पडलेला दिसतोय. कुटूंबाच्या पलिकडे सत्ता जाता कामा नये हीच यांची प्रवृत्ती आहे. हाच अनुभव बीडकर पुन्हा एकदा घेत आहेत. यांना धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे. असे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी म्हंटले आहे.

**परळीत नक्कीच परिवर्तन**

सोसायटी आदी परिसरामध्ये प्रचार फेरी काढण्यात आली होती.या रॅलीत काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बहादूर भाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष जीवनराव देशमुख, डॉ. दुशंत देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या परळी शहराध्यक्षा ॲड. कल्पनाताई देशमुख, धर्मराज खोसे, शीशेखर चौधरी, शिवाजी देशमुख, रणजीत देशमुख, दीपक शिरसाट, सुनील मस्के, सुभाष देशमुख, गफार शहा, वैजनाथ गडेकर, जावेद भाई, मजहर बाबा शेख, अबूतला आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीस मतदार बंधू भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.रॅलीमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना सालगडी म्हणून सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार महिला आघाडीच्या शहराध्यक्षा ॲड. कल्पनाताई सतीश देशमुख यांनी मतदार बंधू भगिनींना केले.

**स्वत:ला समजू लागल्या**

समजायला निघालात नमिता मुंदडा तुम्हीच सांगा आलिशान गाड्यांमध्ये व्हीआयपी बंगल्यामध्ये राहणाऱ्या तुम्ही आणि ऊस तोडणी करणाऱ्या त्या महिला मग खरी झाशीची राणी कोण असाच प्रश्न केज मतदार संघाला प्रश्न केज मतदार संघाला निर्माण झालेला आहे. सध्या निवडून येण्यासाठी नमिता मुंदडा त्यांचे सासरे पती हे काही पण शक्कल लढून सोशल मीडियाचा वापर करून प्रचार करताना दिसून येत आहेत. मात्र त्यांना अजून तरी काही मेळ लागला नसून त्यांना मतदार स्वीकारताना दिसून येत नाहित असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.

**वैद्यनाथ कारखाना पून्हा**

झाला आहे. येत्या गुरूवारी १४ तारखेला वैद्यनाथ कारखान्याचे रोलर पूजन आहे. आणि २५ नोव्हेंबरला ऊसाची मोळी टाकण्याचा कार्यक्रम आहे. प्रभू वैद्यनाथ आणि लोकनेते मुंडे साहेबांच्या कृपेने हा कारखाना यंदा सुरू होत आहे. सर्व सामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन हा कारखाना पुन्हा सुरू करत आहे, याचा मला आनंद होत आहे असं आ. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या. आ. पंकजाताई मुंडेंच्या या गोड बातमीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांत आनंद व्यक्त होत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# केस नसताना डोक्यावरून कंगवा फिरणारे खूप...

## गडकरींचा मुख्यमंत्रिपदावरून मविआच्या नेत्यांना चिमटा

**मुंबई :**

महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक असलेल्या नेत्यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी चिमटा काढला. केस नसताना डोक्यावर कंगवा फिरवणारे खूप लोक असतात, असे गडकरी म्हणाले. महाविकास आघाडीला बहुमतच मिळणार नाही, असे राजकीय भाकितही नितीन गडकरींनी केले. एका वृत्तवाहिनीला नितीन गडकरींनी मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी महाविकास आघाडीतील अंतर्गत कलहावर सूचक भाष्य केले.

काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये मुख्यमंत्रिपदावरून जोरदार दावेदारी सुरू आहे, तुम्ही याकडे कसं बघता? असा प्रश्न नितीन गडकरींना विचारण्यात आला होता. त्याला उत्तर देताना नितीन गडकरींनी महाविकास आघाडीला टोला लगावला.

नितीन गडकरी म्हणाले, "नाही, त्यांच्या दावेदारीत काही अर्थ नाही. असं प्रत्येक जण दावेदारी करत असतो. एक सिनेमा आला होता, 'थांब टकल्या भांग पाडते'. केस नसताना डोक्यावर कंगवा फिरवणारे खूप लोक आहेत. नाना



त्यातले आहेत, असं मला म्हणायचं नाही." गडकरी पुढे म्हणाले, "आता सध्या आघाडीमध्ये खूप मुख्यमंत्री आहेत. काही सुप्त आहेत, काही अतृप्त आहेत. काही दिसतात, काही दिसत नाहीत. पण, ही खरी सर्कस आहे आणि या सर्कशीमध्ये रिंगमास्टर आहेत शरद पवार. ते आहेत म्हणून ही सर्कस टिकून आहे", असे गडकरी म्हणाले.

शरद पवार ज्या दिवशी थांबतील, एक मिनिटांत डोलारा खाली पडेल. त्यामुळे त्यांनी सांभाळून ठेवलं आहे. त्यामुळे सध्या तरी जोपर्यंत निवडणूक होत नाही... पहिलं तर बहुमतच मिळणार नाही. मिळाली तर हे बनतील अशी शक्यता नाही. तोपर्यंत प्रत्येकाने मनात आनंद घेतला की, मी होणार आहे. तर तेवढे दिवस त्यांना आनंद घेऊ द्या", असा चिमटा गडकरींनी महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक असलेल्यांना काढला.

# 'झालं गेलं विसरून जाऊ' ; रावसाहेब दानवे आणि अर्जुन खोतकर यांच्यात दिलजमाई

**जालना :**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर दुरावलेले माजी केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब दानवे व शिवसेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांच्यात पुन्हा दुसऱ्यांदा दिलजमाई झाली. झाले गेले विसरून विधानसभा निवडणुकीत आपण एकमेकांचे काम करू, असे दोघांनीही पत्रकारांना सांगितले.

लोकसभा निवडणुकीत रावसाहेब दानवे यांचा पराभव झाल्यानंतर खोतकर व दानवे यांच्यात मोठा राजकीय दुरावा निर्माण झाला. विधानसभा निवडणुकीत अर्जुन खोतकर हे महायुतीचे जालन्यातून उमेदवार आहेत तर रावसाहेब दानवे यांचे चुलत भाऊ भास्करराव दानवे यांनीही येथून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, दानवे यांनी अर्ज मागे घेतला. परंतु, जालन्यात भाजपचे कोणतेही कार्यकर्ते खोतकर यांच्या प्रचारात सक्रिय नसल्याने खोतकर अडचणीत सापडले होते. मुख्यमंत्र्यांच्या सभेसाठी आपण यावे म्हणून अर्जुन खोतकर व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर यांनी सोमवारी सकाळी ७ वाजता रावसाहेब दानवे यांचे भोकरदन येथील निवस्थान गाठले. मात्र, दानवे प्रचारासाठी ग्रामीण भागात गेले होते. खोतकर यांनी दानवे यांना फोन करून आपण घरी आलो आहोत, असा निरोप दिला. त्यानंतर दानवे घरी आले.



दरम्यान, खोतकर आणि दानवे यांच्यात तब्बल दोन तास खलबते झाली. त्यामध्ये मागच्या अनेक चुकांवर प्रकाश टाकण्यात आला. आता आपण झाले गेले विसरून पुढे काही चुका होणार नाही असा शब्द दानवे आणि खोतकरांनी एकमेकांना दिला. पुन्हा महायुतीचा सुखाने संसार करण्याचा निर्णय घेतला. यावेळी शिवसेना शिंदे यांचे पदाधिकारी विशाल गाढे, भूषण शर्मा यांची उपस्थिती होती.

**रावसाहेब दानवे यांनी आशीर्वाद दिला**

माजी राज्यमंत्री तथा जालना मतदार संघातील महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांनी सांगितले की, मी जालन्यातुन महायुतीचा उमेदवार आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जालना येथे सभा आहे. त्याचे निमंत्रण देण्यासाठी व दानवे यांचा आशीर्वाद घेण्यासाठी आज येथे आलो. दानवे यांनी मला आशीर्वाद दिला आहे, ते माझ्या प्रचारासाठी येणार आहेत. मागच्या काळात जे काही मतभेद होते, गैरसमज होते ते दूर झाले आहेत. यापुढे आमच्यात कोणताही दुरावा निर्माण होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ, आमचे कार्यकर्ते सुध्दा भोकरदन मतदार संघात संतोष दानवे यांना निवडून आणण्यासाठी परिश्रम घेतील, असे खोतकर यांनी सांगितले.

**जुन्या वादावर पडदा**

माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, मी राज्य पातळीवर काम करणारा नेता आहे. आतापर्यंत राज्यात अनेक ठिकाणी जाऊन महायुतीसाठी सभा घेतल्या. त्यामुळे जालन्यात जाता आले नाही. मी पक्षशिस्त पाळणारा, त्यामुळे खोतकर आले नसते तरीही मी महायुतीचा प्रचार करणार होतो. मात्र अर्जुनराव खोतकर घरी आले. आमच्यात चर्चा झाली, मागे काय झाले यावर पडदा टाकून पुढे एकत्र काम करण्याचे ठरले आहे. मी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेसाठी जाणार आहे. माझा लोकसभेत जो पराभव मान्य करून परत कामाला लागलो आहे. मी खचून जाणारा कार्यकर्ता नाही असे दानवे यांनी सांगितले.



# कदम-देशमुखांच्या दुसऱ्या पिढीत पहिल्यांदा थेट लढत

**सांगली :**

पलूस-कडेगाव मतदारसंघात कदम व देशमुख ही दोन घराणी पारंपरिक विरोधक आहेत. या घराण्यातील दुसऱ्या पिढीतील माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम व भाजपचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संग्राम देशमुख यांच्यात पहिल्यांदाच थेट लढत होत आहे. त्यामुळे ही लढत राज्यात लक्षवेधी ठरणार आहे.

पूर्वीच्या भिलवडी-वांगी मतदारसंघाचे नाव आता पलूस-कडेगाव विधानसभा झाले आहे. १९९५ पासून माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम व माजी आमदार संपतराव देशमुख या दोन घराण्यांत पारंपरिक लढत सुरू झाली. १९९६ ला संपतराव देशमुख यांच्या निधनानंतर त्यांचे बंधू पृथ्वीराज देशमुख व डॉ. पतंगराव कदम अशी लढत झाली.

पुढे २०१८ साली डॉ. पतंगराव कदम यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे पुत्र डॉ. विश्वजित कदम हे सलग दोन वेळा निवडून आले. यावेळी २०१८ ची पोटनिवडणूक व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत देशमुख घराण्यातील कोणी मैदानात नव्हते. मात्र, २०२४ च्या निवडणुकीत कदम-देशमुख या दोन पारंपरिक विरोधी घराण्यातील दुसऱ्या पिढीत पहिल्यांदाच थेट लढत होत आहे.

**कळीचे मुद्दे**

ताकारी व टेंभू योजनेच्या कामांचा श्रेयवाद मतदारसंघात सुरू आहे. त्यासाठी डॉ. पतंगराव कदम यांनी निधी आणला, तर संपतराव देशमुख हे या योजनेचे जनक आहेत, असे दावेप्रतिदावे सुरू आहेत.साखर कारखान्यांची बिले व उसाला दर यावरून आरोप होत आहेत. यामध्ये उसाची बिले शेतकऱ्यांना देण्यास विलंब व थकबाकी असा मुद्दा गाजत आहे.पलूस तालुक्यातील क्षारपड जमिनीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर तातडीने व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

महापूर आल्यानंतर नदीकाठच्या गावांना स्थलांतरित व्हावे लागते. हे स्थलांतर कायमस्वरूपी थांबविण्यासाठी ठोस उपाययोजनांची आवश्यकता आहे. टेंभू योजनेची जलवाहिनी शेताच्या बांधावर पोहोचविण्याचे आश्वासन दोन्ही बाजूने मतदारांना दिले जातेय.

# "गुवाहाटीला जाणार आहे, पण विमानाने..."

## शहाजी बापू पाटलांचा उद्धव ठाकरेंवर पलटवार

**सांगोला :**

उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री पद गेल्यापासून सत्ताधाऱ्यांना शिव्या देण्यापलीकडे ते कोणताही अजेंडा जनतेसमोर मांडत नाहीत, मला गुवाहाटीला जाण्याचं तिकीट उद्धव ठाकरे यांनी काढून द्यायचं ठरवलं आहे. परंतु मी रेल्वेने जाणार नाही, तर विमानाने जाणार आहे. त्याची तजवीज करा, असा टोला पाटील यांनी ठाकरेंना लगावला.

रविवारी सांगोल्यात ठाकरे गटाची प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शहाजी बापू पाटील यांच्यावर टीका केली होती. आता उद्धव ठाकरे यांच्या टीकेला उत्तर देत शहाजी बापू पाटील यांनी जोरदार पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री पद गेल्यापासून




सत्ताधाऱ्यांना शिव्या देण्यापलीकडे ते कोणताही अजेंडा जनतेसमोर मांडत नाहीत, असे म्हणत शहाजी बापू पाटील यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

पुढे शहाजी बापू पाटील म्हणाले, मला गुवाहाटीला जाण्याचं तिकीट उद्धव ठाकरे यांनी काढून द्यायचं ठरवलं आहे. परंतु मी गुवाहाटीला जाणार आहे. पण, रेल्वेने जाणार नाही, तर विमानाने जाणार आहे. गुवाहाटीला जाऊन कामाख्या देवीचे दर्शन घेणार आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदासाठी पाठिंबा देण्यासाठी येणार आहे, असे शहाजी बापू पाटील यांनी म्हटले आहे.

# 'आमच्याशिवाय कोणतेही सरकार चालणार नाही, आम्ही किंगमेकर राहणार' नवाब मलिकांनी स्पष्टच सांगितलं

**मुंबई:**

विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून महाविकास आघाडी आणि महायुतीच्या प्रचारसभा सुरू आहेत. दोन्ही बाजूंनी सरकार येण्याचा दावा केला जात आहे. माजी मंत्री आमदार नवाब मलिक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढत आहेत.

मलिक यांनी सरकारबाबत मोठे विधान केले आहे. 'निकालानंतर काहीही होऊ शकते', असं विधान त्यांनी केले आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.

नवाब मलिक म्हणाले, बारामतीमधून अजित पवार निवडून येतील. पवार कुटुंबाने एकत्र यावे अशी सर्वांची इच्छा आहे, असंही मलिक म्हणाले. आता 'एक है तो सेफ है', मला वाटतंय भाजपाचा दृष्टीकोण बदलत आहे. आम्ही हिंदू, मुस्लिम, शिख सर्वांनी एक राहिले पाहिजे. जाती, धर्म, भाषा असताना सर्व लोक एक राहिले पाहिजे अशी आमची विचारधारा आहे. जर भाजपाची विचारधारा बदलत असेल तर चांगली गोष्ट आहे, असंही नवाब मलिक म्हणाले.

**'निकालानंतर काहीही होऊ शकते'**

"माझ्या शर्तीवर पाठिंबा राहिलं. काही वेगळ्या गोष्टी होत असेल तर आमचा पाठिंबा राहणार नाही. आम्ही सरकारमध्ये किंगमेकर राहणार आहे. २३ तारीख येऊद्या कोण कोणासोबत राहते हे त्यावेळी कळेल, असं मोठं विधान नवाब मलिक यांनी केले. सगळ्यांनीच आता पॉलिटीकल ॲडजस्टमेंट केली आहे, २०१९ च्या निवडणुकीत जसं झाले तसे याही निवडणुकीत निकालानंतर काहीही होऊ शकते, असा दावा नवाब मलिक यांनी केला.

# "काँग्रेसचे नेते संधिसाधू, गरिबांच्या समस्येबद्दल त्यांना काहीही देणं-घेणं नाही", माधवी लतांचा घणाघात

**सोलापूर :**

काँग्रेसचे नेते संधिसाधू, अवसरवादी आहेत. त्यांना गरिबांच्या समस्येबद्दल काहीही देणे घेणे नाही, अशी टीका हिंदुत्ववादी नेत्या माधवी लता यांनी रविवारी केली. विश्व हिंदू परिषदेच्यावतीने माधवनगर पटांगणात आयोजित लोकजागर अभियानात माधवी लता बोलत होत्या.

त्या म्हणाल्या, काँग्रेसच्या सर्व नेत्यांना जहागीरदारीतून सत्ता मिळाली. या नेत्यांना काहीही कमवावे लागले नाही. वरपासून खालपर्यंत सर्व नेते जहागीरदारीचे साम्राज्य चालवतात. गरिबाच्या घरात अन्न गेले आहे की नाही, त्यांना रोजगार मिळतोय की नाही याबद्दल त्यांना काहीही देणे घेणे नसते. केवळ ते जहागीरदारीची परंपरा चालवत आहेत. ज्यांना देशाची संस्कृती माहिती नाही, त्या लोकांच्या हातात अनेक वर्षे सत्ता राहिली. त्यामुळे संस्कृतीचा ऱ्हास झाला असा दावाही माधवी लता यांनी केला.

यावेळी परिषदेचे प्रांत सदस्य लक्ष्मण चव्हाण, संपर्कप्रमुख पुरुषोत्तम उडता, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, खजिनदार हितेश माधू, जिल्हा मंत्री संजय जमादार आणि बजरंग दलाचे जिल्हा सहसंयोजक नागेश बंडी, धर्मप्रसार प्रमुख रवी बोल्ली आदी उपस्थित होते.



**हैदराबादेत वक्फ बोर्डाच्या मालमत्तांचा भ्रष्टाचार**

हैदराबाद शहरात वक्फ बोर्डाच्या जमिनीवर गरिबांच्या वस्ती आहेत. या मालमत्ता ताब्यात घेऊन काही लोकांनी टोलेजंग इमारती उभारल्या आहेत. यातून केवळ गरिबांचे नुकसान झाले. जमिनी लाटणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पैसे कमावले. हे थांबवण्याची हिंमत कोणामध्येही नाही, असे माधवी लता म्हणाल्या.



# 'काँग्रेसमध्ये १४ वर्ष मी भोगलं...

## पक्ष सोडल्यानंतर अशोक चव्हाणांनी पहिल्यांदाच सांगितला अनुभव

**नांदेड:**

'कोणत्याच निवडणुकीची लढाई सोपी नसते. निवडणूक अशीच असते, शेवटपर्यंत लढायचे असते, गोळी कुठून येईल सांगता येत नाही. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे, वातावरण चांगले आहे. नांदेडमधील जागा भाजप जिंकेल,' असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे नेते, राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी बोलताना अशोक चव्हाण यांनी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाबद्दल खळबळजनक खुलासे करतानाच पक्ष सोडण्याचे कारण पहिल्यांदाच स्पष्ट केले आहे.

'कोणत्याच निवडणुकीची लढाई सोपी नसते. निवडणूक अशीच असते, शेवटपर्यंत लढायचे असते, गोळी कुठून येईल सांगता येत नाही. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे, वातावरण चांगले आहे. मी केलेले काम बोलते, लोक म्हणतात आम्ही भाजपला मदत करत नाही, तुम्हाला मतदान करतोय. असंही लोक म्हणतात. मी काँग्रेसमध्येही असताना माझा व्यक्तिगत अजेंडा नव्हता. भाजपमधल्याही नवीन पद्धती मी आत्मसात करतोय. माझा व्यक्तीगत अजेंडा नाही. नांदेड हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. मी इथे काँग्रेस रुजवली. आता भाजपमध्ये आल्यानंतर ही माझी पहिलीच निवडणूक आहे, त्यामुळे सर्व नेत्यांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याचा प्रयत्न मी करतोय,' असं अशोक चव्हाण यावेळी म्हणाले.

'माझ्या मागे ईडी सीबीआय काही नाही. जे घडलं ते काँग्रेसच्या काळात घडलं. कुठल्याही छाप्याशी काही संबंध नाही. १४ वर्ष मी काँग्रेसमध्ये सहन केलं. त्यातले बरेचसे लोक स्वर्गवासी झालेत. काँग्रेसमध्ये माझी प्रगती कदाचित काही जणांना पटत नव्हती, असं मला वाटतं. मी मुक्तपणे काम करणारा माणूस आहे. राज्यात विविध स्वरावर माझी प्रगती झाली. ती काही लोकांना पटत नव्हती. त्याकाळात रचलेले षडयंत्र रचले गेले, जे मी १४ वर्ष भोगले. असे म्हणत अशोक चव्हाण यांनी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणावर भाष्य करतानाच पक्ष सोडण्याचे कारण पहिल्यांदाच स्पष्ट केले. तसेच आदर्श प्रकरणात अद्यापही काही सिद्ध झालेलं नाही, कोणीही करु शकत नाही. ओढून ताणून ते प्रकरण लावण्याचा प्रयत्न झाला. सगळ्यात घाणेरडं राजकारण म्हणजे पक्षांतर्गत राजकारण. आम्ही सर्व त्या राजकारणाचे शिकार आहोत,' अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

शंकरराव चव्हाण आणि शरद पवार यांच्यामधील मधुर संबंध सर्वांना माहित होते. दुर्दैवाने शरद पवार आता माझ्याबद्दल बोलत आहेत, तो त्या संबंधांचा पुढील भाग असावा असे मला वाटते. शरद पवारांनी माझ्यासारख्या लहान माणसांवर बोलावं. त्यांनी माझी तुलना करावी किंवा दखल घ्यावी असा माणूसच मी नाही. शरद पवार मोठे नेते आहेत. बिल क्लिंटनपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत त्यांचे संबंध आहेत. दांडगाईने राजकारण करण्याची काही नेत्यांची प्रवृत्ती आहे. शंकरराव चव्हाणांनी ते अनुभवले. शंकरराव चव्हाणांनाही पक्ष मिटींगमध्ये धक्काबुकी करण्यात आली होती. ही राजकारणाची संस्कृती आहे का? असे म्हणत अशोक चव्हाण यांनी शरद पवारांवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला.

# धनंजय मुंडेंनी कमळ घेतलं असतं तर बरं झालं असतं, पंकजा मुंडेंनी व्यक्त केली खंत

**परळी :**

धनंजय मुंडे यांनी कमळच हाती घेतलं असतं तर बरं झालं असतं, असं विधान भाजप नेत्या आणि विधान परिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांनी केलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या प्रचारसभेत पंकजा मुंडे बोलत होत्या.त्यावेळी त्यांनी हे विधान केले. विशेष म्हणजे, पंकजा मुंडे यांच्या या विधानामुळे व्यासपीठावर उपस्थित धनंजय मुंडे यांनाही आपले हसू आवरता आले नाही.

बीड जिल्ह्यातील परळीतून धनंजय मुंडे हे विधानसभा निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या प्रचारासाठी पंकजा मुंडे यांनी जाहीर सभा घेतली. यावेळी आम्ही एकमेकांना एकमेकांच्या विरोधात खूप शक्ती वाया घालवली. धनंजय मुंडे यांनी कमळाच्या चिन्हावर लढायला पाहिजे होतं, असं विधान करत पंकजा मुंडे यांनी करत आपल्या मनातील खंत



बोलून दाखवली.

परळी विधानसभेत आपले कमळ चिन्ह नाही, तुम्ही ते शोधणार आहात हे मला माहिती आहे. म्हणूनच धनंजय मुंडेंनी कमळ घेतलं असतं तर बरं झालं असतं. आता आपल्याला धनंजय मुंडेंना आमदार करायचं आहे. या देशात अनेक परिवार एकमेव एकमेका विरुद्ध लढत आहेत. राजकारणाची पातळी अनेक जणांनी सोडली आहे. या निवडणुकीत आपण एक आहोत सर्वांना दाखवून द्यायचं आहे. सन्मानाची लढाई असते, पैशाची सत्तेची नसते, असंही यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या.

याचबरोबर, परळीमधून २००९ ला आमदार होईल, असं माझ्या मनात कधीही नव्हतं. मी कधीच मुंडे साहेबांचा शब्द खाली टाकला नाही. आमचं घर फुटलं आणि महाराष्ट्र बघत होता. बाबा एकटे पडले म्हणून मी राजकारणात आले. मी जीवनात काय चांगलं काम करू शकले, मला माहिती नाही. मात्र वाईट काम मी कधीच केलं नाही. मी ज्यावेळेस लोकसभेला उभी राहिले, त्यावेळी माझा भाऊ माझ्यासोबत आला आणि माझा प्रचार केला, मला खूप चांगलं वाटलं, असंही पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

कुठलीही छोटी निवडणूक सोपी समजणं हे आपल्या रक्तात नाही. आपण प्रत्येक निवडणूक जीव लावून लढतो. त्यामुळं आपल्याला बदला घ्यायचा नाही, तर राजकारणाचे वातावरण बदलायचं आहे. मुंडे साहेब असते तर हे राजकारण बघून भावनिक झाले असते. त्यामुळं आपल्याला हा विजय मिळवायचाच आहे आणि गुलाल उधळायचा आहे. ईश्वरासमोर आणि मुंडे साहेबांव्यतिरिक्त कुणासमोरही झुकायचे नाही, असंही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

**सुविचार** - आचाराच्या उंचीवर विचारांची भव्यता अवलंबून असते.


## चुरस वाढली....!

सुरुवातीला म्हणजेच लोकसभा निवडणुकीचे निकाल आल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण महाविकास आघाडीसाठी बरेच अनुकूल होते आणि त्यामुळेच हरियाणासोबतच महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक घेण्याचे सत्ताधाऱ्यांनी टाळले. लोकसभेत दणका बसल्यानंतर महायुतीचे नेते सावध झाले, विशेषतः भाजपने या पराभवाची गंभीर दखल घेतली. कुठे चुकले, कशामुळे चुकले याची चिकित्सा करण्यात आली. महायुती सरकारची प्रतिष्ठा सावरण्यासाठी काही लोकप्रिय घोषणा करण्यात आल्या, तिजोरीची दारे अगदी सताड उघडल्या गेली. लोकसभा निवडणुकीत मराठा समाज जवळपास पूर्णपणे महाविकास आघाडीच्या बाजूने होता, त्यामुळे या समाजाला न दुखावता ओबीसी समाजाची मतपेढी आपल्या बाजूने पक्की करण्यासाठी भाजपने सूक्ष्म स्तरावर नियोजन केले. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बऱ्यापैकी तटस्थ होता, त्याचाही फटका काही प्रमाणात भाजपला बसला. यावेळी संघाचे कार्यकर्ते नेहमीप्रमाणे पडद्याआड आपले काम करीत असल्याचे दिसून येते आहे. जागावाटपामध्ये कमी-जास्त होणार आणि त्यातून अनेक ठिकाणी बंडखोरी होणार हे अपेक्षितच होते; परंतु बंडखोरीचे प्रमाण मर्यादित राखण्यात महायुतीला यश आल्याचे दिसते. शिवाय बंडखोरीचा फटका महाविकास आघाडीलाही बसला आहेच. हरियाणातील डावपेचांची पुनरावृत्ती करीत भाजपने काही मतदारसंघात अपक्षांना पाठबळ दिल्याचे बोलले जात आहे, या सगळ्या तयारीचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. दोन महिन्यांपूर्वी एकतर्फी वाटत असलेली ही निवडणूक आता कमालीची चुरशीची झाली आहे. अनेक मतदारसंघात अगदी हजार-पाचशेच्या मताधिक्क्याचा निकाल लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आता पुढचे आठ दिवस राज्यात प्रचाराचा गदारोळ असेल. काँग्रेसची मदार प्रामुख्याने राहुल गांधींवर असणार आहे. मल्लिकार्जुन खर्गेदेखील प्रभावी ठरू शकतात. राहुल गांधी संविधानाचा मुद्दा पुन्हा एकदा लावून धरत असल्याचे दिसते. त्यासोबतच स्थानिक स्तरावरील मुद्देदेखील महाआघाडीसाठी जमेची बाजू ठरत आहे. लोकसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रात कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी महायुतीला धडा शिकविला, यावेळी विदर्भात सोयाबीनचे पडते भाव महायुतीसाठी डोकेदुखी ठरू पाहत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे आहेतच, शिवाय नेहमीप्रमाणे जातीय समीकरणेही निवडणुकीवर प्रभाव टाकतील. भाजपने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगींना प्रचारात उतरविले आहे. त्यांचा 'बटेंगे तो कटेंगे' नारा उत्तेजक ठरत असला तरी विधानसभा निवडणुकीत ध्रुवीकरणाचे गणित जुळेलच याची खात्री नाही. शिवाय महायुतीसाठी अजित पवार गट 'कच्ची कडी' ठरू शकतो. अजित पवार गटाचे उमेदवार असलेल्या बहुतेक ठिकाणी शरद पवार गटाचे उमेदवार त्यांच्या विरोधात उभे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांना अजित पवारांची बंडखोरी पचलेली नाही, त्यामुळे सहानुभूतीचा लोलक शरद पवार गटाकडे वळत असल्याचे दिसते. या पृष्ठभूमीवर भाजप आणि शिंदे गटाचे नेते, कार्यकर्ते किती प्रामाणिकपणे अजित पवारांच्या उमेदवारासाठी काम करतात, हा लाखमोलाचा प्रश्न ठरतो. अजित पवार गटाने लोकसभेत भाजपसाठी काम केले नसल्याचा आरोप भाजपचे कार्यकर्ते अगदी उघडपणे करताना दिसतात. दुसरीकडे अमित शाह वगैरे मंडळींनी महायुती सत्तेत आली तर देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील, हे अप्रत्यक्षरित्या जाहीर करून टाकले आहे. त्यामुळे शिंदे गटातही नाराजी दिसते. या पृष्ठभूमीवर या तिन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकत्रित निवडणुकीला सामोरे जातील का, यावरही बरेच काही अवलंबून आहे. थोड्या फार फरकाने महाआघाडीतही तिच परिस्थिती दिसते. महाआघाडीतील तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढत असल्याचाच भास होत आहे. ज्या समस्या युतीला भेडसावत आहेत त्याच आघाडीलाही त्रास देत आहेत. फक्त वर्तमान सरकारबद्दलची नाराजी आणि दलित-मुस्लीम समाजाची मतपेढी आघाडीसाठी 'गेमचेंजर' ठरू शकते. मराठा समाजाने लोकसभेप्रमाणेच याही निवडणुकीत भाजप आघाडीच्या विरोधात ठरवून मतदान केले तर महायुतीला किमान मराठवाड्यात तरी मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. शरद पवार गट प. महाराष्ट्रात प्रभावी ठरण्याची शक्यता आहे, त्यामुळे काँग्रेसने विदर्भाचा गढ राखला आणि उद्धव ठाकरे गटाने मुंबई पट्ट्यात चांगली कामगिरी केली तर महाविकास आघाडीला बहुमताचा आकडा सहज गाठता येईल. महायुतीसाठीदेखील विदर्भ आणि मुंबई अतिशय महत्त्वाचे प्रांत ठरू शकतात.

## झाडाझडती कशासाठी....?

यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे प्रचारासाठी आलेल्या उद्धव ठाकरेंच्या हेलिकॉप्टरची काही अधिकाऱ्यांनी तपासणी केल्याचा मुद्दा बराच गाजत आहे. अधिकारी हेलिकॉप्टरची तपासणी करीत असताना उद्धव ठाकरेंनी त्यांना याबाबत काही प्रश्न विचारले, या सगळ्याचे चित्रीकरण केले. निवडणुकीच्या काळात अवैधरित्या पैशाची किंवा अन्य आक्षेपार्ह वस्तूंची वाहतूक होऊ नये यासाठी निवडणूक विभागाकडून अनेक ठिकाणी चेकपोस्ट उभ्या केल्या जातात. काही वाहनांमध्ये मोठ्या रकमा सापडल्याच्या बातम्याही येत असतात; परंतु एखाद्या बड्या राजकीय पक्षाच्या नेत्याच्या आणि त्यातही राज्याच्या माजी मुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरची अधिकाऱ्यांनी तपासणी करण्याचा हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा. एरवी हे अधिकारी लोक विमान किंवा हेलिकॉप्टरमधील बॅगा व्यवस्थित घेऊन जाताना दिसतात; परंतु त्या उघडून तपासताना ते कधी आढळले नाहीत. त्यामुळेच उद्धव ठाकरेंनी या अधिकाऱ्यांना यापूर्वी किती नेत्यांच्या हेलिकॉप्टरची किंवा वाहनांची अशी तपासणी केली, असा प्रश्न त्या अधिकाऱ्यांना विचारला. इकडे येणारे तुम्हीच पहिले बडे नेते आहात, म्हणून तुमचीच पहिल्यांदा झाडाझडती होत आहे, असे उत्तर त्यांना मिळाले; परंतु प्रचार दौऱ्यासाठी उद्धव ठाकरेंनीच पहिल्यांदा हेलिकॉप्टर वापरले, अशातला प्रकार नाही. सगळ्याच पक्षाचे बडे नेते हेलिकॉप्टरचा वापर करतात, या निवडणुकीतही करत आहेत; परंतु थेट हेलिकॉप्टरमध्ये जाऊन त्यांच्या सामानाची तपासणी कधी कोण्या अधिकाऱ्याने केल्याचे ऐकिवात नाही. मागच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हेलिकॉप्टरमधून अनेक बॅगा उतरविल्या जात असल्याचा व्हिडिओ समोर आला होता, त्या बॅगा कोणतीही तपासणी न करता व्यवस्थितपणे बाहेर पोहचविण्यात आल्या, शिवाय इतर कोणत्याही नेत्याच्या हेलिकॉप्टरची किंवा अन्य वाहनांची अशी तपासणी होत नाही, खास करून सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांची. हे झाडाझडतीचे भोग उद्धव ठाकरेंच्याच नशिबी का आले, या प्रश्नाचे उत्तर अधिकाऱ्यांनी द्यायला हवे. त्यासोबतच इतर नेत्यांच्या हेलिकॉप्टरची अशी तपासणी का केली जात नाही, याचेही उत्तर अपेक्षित आहे.

### स्थित्यंतर



राही भिडे
9867521049

# निवडणुकीत वाचाळवीरांचीच चलती!

निवडणुकीत जिंकून येण्यासाठी राज्याच्या विकास कामांबरोबरच भविष्याचा सुस्पष्ट जाहीरनामा समोर ठेवून लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो मात्र राजकारण्यांना त्याचा विसर पडला आहे. सर्व वयोगटातील माणसांच्या हातात रोख रक्कम देऊन मतांसाठी आमिषे दाखवली जात आहेत. महाराष्ट्र हे वैचारिकदृष्ट्या पुढारलेले राज्य समजले जात होते; परंतु राजकारण्यांचा रोज सुरू असलेला शिवीगाळ कार्यक्रम आणि वाढती गुन्हेगारी पाहता 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा' असे म्हणण्याची वेळ जनतेवर आली आहे.

निवडणूक लोकसभेची असो किंवा विधानसभेची; नेत्यांच्या भाषणातील रंगत मात्र कमी झाली आहे. निवडणुकांच्या प्रचार सभांतून वैचारिक खाद्य मिळणे आता जवळपास बंद झाले आहे. निवडणूक मुद्यावरून आता गुद्यावर यायला लागली आहे. मूलभूत प्रश्नांचा मतदारांना विसर पडावा आणि केवळ वादग्रस्त मुद्यांचीच चर्चा व्हावी, असा एकूण राजकीय पक्षांचा हेतू दिसतो. त्यातूनच वाचाळवीरांना पुढे करून त्यांच्या माध्यमातून निवडणुकीत प्रचाराचा दर्जा घसरवण्याचे काम केले जात आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून अन्य सर्वच नेत्यांनी केलेली भाषणे पाहिली, तर या भाषणातून देशाला किंवा राज्यांना काही दिशा दाखवली जाईल, लोकांच्या हिताचे सर्वसमावेशक असे कार्यक्रम राबवले जातील, या विषयी फारसे मार्गदर्शन होतच नाही. त्याऐवजी एकमेकांना शिवराळ भाषा वापरणे, परस्परांची निंदानालस्ती करणे यावर भर दिला जात आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर अवघ्या पाच महिन्यात होत असलेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतही दुर्दैवाने हेच चित्र दिसत आहे. विधानसभेच्या निवडणुकीतील प्रचार राज्यातील प्रश्नांवर केंद्रीत असायला हवा किंवा निवडून आल्यानंतर आपण काय करणार याचे दिशादर्शक चित्र मतदारांपुढे उभे करायला हवे; परंतु तसे होत नाही. आता प्रचार व्यक्तिगत पातळीवर आला आहे. राजकीय पक्ष परस्परांची धुणी निवडणुकीच्या धोबी घाटावर धूत आहेत. एकमेकांना दूषणे देण्यावर भर दिला जात आहे. नाकी, डोळे मारणारी, बंटी, बबली, डांसर अशा अनेक शेलक्या विशेषणांबरोबरच आता प्राण्यांच्या उपमा नेत्यांना दिल्या जात आहेत. कोण कोणाला कुणाचा कुत्रा म्हणतो, तर कोण कोणाला विषारी साप म्हणतो, अशी सध्या निवडणुकीतील प्रचाराची एकंदरीत स्थिती आहे. आदर्श निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी होते आहे, की नाही असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. निवडणूक आयोग स्वतः काही करत नाही आणि तक्रार येण्याची वाट पाहत बसतो. एकमेकांना आईवरून शिवीगाळ करणे किंवा एखाद्या नेत्याच्या आजारपणावरून टीका करणे यावरून निवडणुकीची पातळी किती घसरलेली आहे हेच दिसून येते. एखाद्या सभेत वक्ता काही आक्षेपार्ह बोलत असेल, तर त्याच्या प्रमुख नेत्याने त्याला मध्येच थांबवायला हवे; परंतु तसे होत नाही. संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांचा कार्यकर्ता वसंतराव देशमुख ज्या भाषेत महिलांविषयी आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या कन्या डॉ. जयश्री यांच्याविषयी बोलत होता. यावरून आपली राजकीय नैतिकता किती घसरली आहे, हे लक्षात येते आणि वसंतराव देशमुख यांच्यासारख्यांच्या भाषणाला उपस्थितही तेवढीच दाद देत होते, यावरून नेत्यांनी कार्यकर्त्यांचा स्तरही किती खालच्या पातळीवर नेऊन ठेवला आहे, हे दिसते. निवडणूक प्रचार हा लोकशाहीविषयी जागृतीचा आहे की मनोरंजनाचा की इतरांची खिल्ली उडवण्याचा कार्यक्रम आहे हे एकदाचे ठरवून घेतले तर बरे होईल.

निवडणुकीत जिंकून येण्यासाठी राज्याच्या विकास कामांबरोबरच भविष्याचा सुस्पष्ट जाहीरनामा समोर ठेवून लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो मात्र राजकारण्यांना त्याचा विसर पडला आहे. सर्व वयोगटातील माणसांच्या हातात रोख रक्कम देऊन मतांसाठी आमिषे दाखवली जात आहेत. महाराष्ट्र हे वैचारिकदृष्ट्या पुढारलेले राज्य समजले जात होते; परंतु राजकारण्यांचा रोज सुरू असलेला शिवीगाळ कार्यक्रम आणि वाढती गुन्हेगारी पाहता 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा' असे म्हणण्याची वेळ जनतेवर आली आहे. सत्ताधारी पक्षाचे नेतेदेखील अनेकदा शिवराळ भाषा वापरतात, मोठ्या व्यक्तींचा आदर करावा अशी आपली संस्कृती सांगते. त्यांचा उल्लेख आदराने करण्याऐवजी एकेरीत येऊन त्यांच्यावर बोलले जाते. साधनशुचितेचे अवडंबर माजविणाऱ्यांनी राजकीय नेत्यांना हीच शिकवण दिली आहे का असा प्रश्न पडतो. रयत क्रांती संघटनेचे संस्थापक आणि माजी कृषिराज्यमंत्री सदाभाऊ खोत हे तर कायम वादग्रस्त विधाने करण्यात आघाडीवर असतात. ते ज्या महायुतीत आहेत, त्या महायुतीचे नेते अशा नेत्यांना पाठीशी घालतात.


वारंवार भाषणे करूनही अशा वाचाळवीरांवर कोणतीही कारवाई होत नाही. खोत हे महायुतीतील घटक पक्षाचे नेते असूनही ते शरद पवार यांच्या आजारपणावरून रंगावरून टीका करतात आणि वादळ निर्माण झाल्यानंतर दिलगिरी व्यक्त करतात. खोत यांच्यासारख्या नेत्यांच्या वक्तव्यांमुळे वाद निर्माण होतो आणि निवडणुकीचा स्तर घसरतो.

विकासाच्या प्रश्नावर चर्चा करण्याऐवजी जनतेचे लक्ष विचलित करून व्यक्तिगत हल्ले करण्याचा हा डाव थांबवायला हवा आणि राज्यासमोरील प्रश्नांची चर्चा व्हायला हवी. खोत यांनी जत विधानसभा मतदारसंघातील गोपीचंद पडळकर यांच्या प्रचारसभेत केलेले भाषणही असेच निषेधार्थ आहे. ज्या पडळकर यांच्यासाठी खोत गेले होते, त्या पडळकर यांची भाषाही खोत यांच्या भाषेपेक्षा अधिक विखारी आहे. पवारांवर अशा पद्धतीने बोलणे हे चुकीचेच आहे. असा अक्षम्य प्रकार खपवून घेता कामा नये; परंतु पडळकर काय किंवा खोत काय वारंवार अशी टीका करीत असताना त्यांच्यावर कुणाचे नियंत्रण आहे की नाही, असा प्रश्न पडावा अशी एकंदरीत स्थिती आहे.

सांगलीच्या सभेत खोत म्हणाले, 'पवार साहेब, तुमच्या चिल्या-पिल्यांनी कारखाने हाणले. बँका हाणल्या. सूतगिरणी हाणल्या' पण पवारांना मानावे लागेल. एवढे होऊनही भाषणात म्हणतात, मला महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलायचा आहे. तुमच्या चेहऱ्यासारखा महाराष्ट्र घडवायचा आहे का, अशा शब्दात त्यांनी पवार यांच्यावर टीका केली होती. या टीकेला खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर देताना खोत हे देवेंद्र फडणवीस यांचे कुत्रे आहेत, असा उल्लेख केला. त्यावरून पुन्हा सदाभाऊचे पित्त खवळले आणि संजय राऊत हे महाविकास आघाडीचे डुक्कर आहेत. डुकराला कितीही साबण लावले तरी ते घाणीतच जाते; पण कुत्रे इमानदार असतात, अशी टीका केली. या टीकेत उडी घेणार नाहीत, तर ते आ. नितेश राणे कसले? नितेश हे कायम वादग्रस्त बोलण्याबाबत प्रसिद्ध आहेत. त्यांनी तर खासदार संजय राऊत यांना उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचा पाळलेला कुत्रा आहे, अशी उपमा दिली. नंतर कुत्राच नव्हे, तर ते साप आहेत अशी प्राण्यांची उपमा दिली. सोलापूर येथील सभेत सदाभाऊ बरळले होते, राज्यकर्ते म्हणजे रेड्यांची अवलाद आहे.

आज देशभर महागाई वाढते आहे त्याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागतो. टोमॅटोचे दर वाढल्याने अभिनेता सुनील शेट्टी यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली होती. त्यावर खोत यांनी ही प्रतिक्रिया देताना टोमॅटो ही काही जीवनावश्यक वस्तू नाही. त्यामुळे टोमॅटो खाल्ले, तर कोणी मरत नाही आणि मेले तर आम्ही सरणाला टोमॅटो पाठवून अशा प्रकारची भाषा त्यांनी वापरली होती. अशी वादग्रस्त वक्तव्यही करण्यात सदाभाऊ कायम आघाडीवर असतात. पवार यांना एकदा तर त्यांनी बारामतीचा वळू असे म्हटले होते. अजित पवार यांनी आता थेट महायुतीच्या नेत्यांनाच इशारा देऊन अशा प्रकारची वादग्रस्त वक्तव्य नेत्यांनी थांबवावीत. कोणावरही खालच्या पातळीवर जाऊन टीका करू नये असे म्हटले आहे. आता याचा किती परिणाम होतो हे पाहायचे.

### सरळ-सरळ



राजेश राजोरे
9822593903

# आदर्श आचारसंहिता आणि जाहिरनाम्यातील आमिष !

शेवटी राज्यात हे सर्व काय चालले आहे? सत्ता प्राप्तीसाठी काहीही देणे, जाहीर करणे, कितपत योग्य आहे. मतदानासाठी उमेद्वाराने पैसे देण्याचे छुपे प्रकार असतांना थेट सरकारनेही पैसे द्यावे, हीच का आदर्श निवडणूक? आणि आदर्श आचारसंहिता?

**करने हैं केवल झूठे वादे, कौन से निभाने हैं आधे?**
**वोट बैंक की है बात, मुद्दा बनेगा जाति-वाद**

महाराष्ट्रात विधानसभेच्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांचा व काही बंडखोर व अपक्षांचा प्रचार जोमात आहे. रॅली, सभा, कॉर्नर मिटिंग, जाती-जाती, समाज-समाज व धर्म-धर्माच्या खुल्या व गोपनीय बैठका होत आहेत. राजी नाराजीचे नाट्य झाले आहे. बंडखोरांना आश्वासने दिल्या गेली आहेत. कोणाला निवडून आणायचे तर कुणाला पाडायचे, त्याची कारणमिंमासा आतून बाहेरुन केली जात आहे.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. निवडणूक निर्भीडतेच्या वातावरणात निपक्षपातीपणे व्हाव्यात, मतदारांना आमिष देण्याचे व गृहउपयोगी किंवा दारु साहित्य वाटप होवू नये, आदिंसाठी निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे. तसेच निवडणूक काळात राजकीय पक्ष व उमेद्वारांनी 'काय करावे व काय करु नये,' असे सांगणारी आदर्श आचारसंहिता लावण्यात आली आहे. आचारसंहिता निवडणूक जाहीर करतानाच लागली तर त्यामुळे सरकार, कर्मचारी, राजकीय पक्ष यांचेवर बंधने आलीत तरी, मात्र आदर्श आचारसंहिताचे खरेच पालन होते का? दोन्ही पक्षांनी दिलेली आश्वासने हा आचारसंहितेचा भंग नाही का? हा मुख्य प्रश्न आहे.

आदर्श निवडणूक आचारसंहितानुसार 'मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.' मतदारांच्या जातीय भावनांना आवाहन करण्यात येऊ नये, निवडणूक प्रचार तसेच भाषण, फलक, संगीत इत्यादी यासाठी देवळे, मशिदी, चर्च, गुरुव्दारे किंवा कोणत्याही प्रार्थनास्थळाचा वापर करु नये, तसेच लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाक दाखविणे, मतदान कक्षापर्यंत मतदारांना पोहचविणे व तेथून परत नेणे, असे करण्यास प्रतिबंध आहे. आदर्श आचारसंहितेतील या ठळक बाबीचा विचार केला तर हे सर्व नियम पायदळी तुडविल्या जातात.

सरकारच्या पाच वर्षाच्या कार्यकाळातील शेवटचे पाचवे वर्ष म्हणजे निवडणूक वर्ष असते. या काळात विशिष्ट हेतुने सरासरी निर्णय घेतले जातात. वास्तविक शेवटच्या वर्षात असे निर्णय घेता येणार नाही, असा नियम असला पाहिजे. मात्र महाराष्ट्रात शेकडो निर्णय घेवून एक प्रकारे 'रे वडी' संस्कृती (फुकट वाटण्याची कृती) जोपासण्यात आली. त्यात कळस म्हणजे मतदारांना थेट पैसे देणे अशी 'लाडकी बहीण योजना' व इतरही योजना जाहीरच नव्हे तर प्रत्यक्षात अंमलात आणल्या गेल्यात. या योजना थेट पैसे देवून मते विकत घेण्याचा आरोप झाला मात्र जुमानते कोण? या लोकप्रिय योजनेने विरोधक घाबरले. आणि मग त्यांनीही ' रे वडी' फुकट वाटपाची रक्कम वाढवून देण्याची घोषणा निवडणूक जाहिरनाम्यात केली. थोडक्यात त्यांनीही 'री' ओढण्याचा प्रकार केला.

महाराष्ट्रात विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडीचे पक्षचिन्ह तुतारी, पंजा व मशालच्या वतीने 'लोकसेवेची पंचसूत्री,' जाहीर करण्यात आली. त्यामध्ये निवडून आल्यानंतर महिलांना दरमहा तीन हजार व मोफत बस प्रवास अशी 'महालक्ष्मी' योजना, शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्जमाफी व नियमित कर्जफेड करणाऱ्यांना पन्नास हजाराचे अनुदान अशी कृषी समृध्दी योजना, कुटुंबाला २५ लाखांपर्यंतचा आरोग्य विमा आणि मोफत औषधांची 'कुटुंब रक्षण' योजना, बेरोजगार तरुणांना दरमहा चार हजार रुपये देणारी योजना, संजय गांधी योजनेचे १५०० ऐवजी २००० रु. अनुदान तर आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे वाढविण्याचे आणि याला 'समानतेची हमी' सांगणारे वचन देण्यात आले आहे.

महिलांना फुकट तीन हजार रुपये महिना व बेरोजगारांना चार हजार रुपये फुकट देण्याची योजना हे मतदारांना आमिष दाखविणे नव्हे का? आणि सत्तेत असलेल्या महायुती (धनुष्यबाण, कमळ, घड्याळ) सरकारने परत सत्ता मिळावी म्हणून नवीन जाहिरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीसह, महिलांना १५०० रु. चे २१०० रुपये दरमहा देणार असे वचन देणारे संकल्पपत्र, वीज बिलात ३० टक्के सूट, उद्योगसाठी १५ लाखाचे बिनव्याजी कर्ज आदी नवीन 'आमिष' नमूद आहेत. विशेष म्हणजे महायुतीच्या प्रचाराच्या जाहिरातमध्ये सध्याची 'लाडकी बहीण' व इतर योजना बंद पडू नये म्हणून महायुतीलाच मतदान करण्याचे आवाहन किंवा ही एक छुपी धमकी पण देण्यात आली आहे.

शेवटी राज्यात हे सर्व काय चालले आहे? सत्ता प्राप्तीसाठी काहीही देणे, जाहीर करणे, कितपत योग्य आहे. मतदानासाठी उमेद्वाराने पैसे देण्याचे छुपे प्रकार असतांना थेट सरकारनेही पैसे द्यावे, हीच का आदर्श निवडणूक? आणि आदर्श आचारसंहिता?

शेवटी राजकारणी आहेत, या आशयाचा एक शेर आठवतो...

**उनका तो फर्ज है**
**वो ऐले सिहासत जाने**
**मेरा फर्ज पैगाम है**
**जहाँ तक पहुँचे...**

### वर्तमान



राजन पांजरी
9819700818

# 'मतदारांनी केलेल्या मतदानाचा अधिकाधिक लाभ विजयी लोकप्रतिनिधींच्या पदरात.!'

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात प्रचारक प्रवक्ते मतदारांना आकर्षित करण्यासाठी शेतीमालाला हमीभाव, मुलींना मोफत शिक्षण, महिला पोलिसांची भरती प्रक्रिया सुरू केली जाईल, जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवले जातील या प्रकारची मोठमोठी तोंडी आश्वासने देत आहेत. एका पक्षाने दिलेल्या आश्वासनांपेक्षा वरचढ आश्वासने देण्याची स्पर्धा सुरू आहे. मात्र, प्रत्येक राजकीय पक्षांना याचे विस्मरण होत आहे की आपण देत असलेली आश्वासने ही लादल्या जाणाऱ्या करांच्या उत्पन्नातून. म्हणजेच निकालानंतर सत्तेत येणाऱ्या कोठल्याही पक्षाकडून मोठ्या प्रमाणात कर लादून दिल्या गेलेल्या आश्वासनांच्या पूर्ती करणे याशिवाय इतर पर्याय नाही. समजदार मतदारांना ह्याची थोडीफार कल्पना आहेच, पण फक्त शाब्दिक आश्वासनांवर विसंबून मतदान करणारा मोठा मतदारवर्ग, उमेदवारावरील भरोसा, पक्षावरील निष्ठा, किंवा काही आमिषांना भुलून देणारा आहे. ज्यांचे प्राबल्य जास्त ते सत्ता हाती घेणारे असल्याने त्यांच्या दबावाखाली पुढील पाच वर्षे प्रत्येक नागरिकाला सहनशीलता दाखवावी लागणार आहे. अशाच प्रकारच्या प्रचारकांचा दुसरा वर्ग जो आपल्या वाचाळतेने समाजावर प्रभाव पडण्याच्या प्रयत्नांत अपमानास्पद वक्तव्य करताना गद्दार, खुद्दार, पाकिटमार, बकरी आणि इम्पोर्टेड माल असे शब्दप्रयोग वापरीत आहे. आज त्याच शब्दांवरून पोलिसांत एफआयआर, व गुन्हे दाखल केले आहेत. निकाल जाहीर होताच, यातील निर्वाचित प्रतिनिधी आपापल्या स्वार्थानुसार पक्षांतरे, बाहेरून पाठिंबा अशा अनेक प्रकारच्या कोलांटउड्या मारत आपल्याला अपेक्षित असलेल्या बाबींची पूर्तता करण्यासाठी वाट्टेल ते करणार आहेत. प्रचारादरम्यान मतदारांना आश्वासने देणारे उमेदवार मात्र ज्यांच्या मतांवर आपण निवडून आलो आहोत ते साफ विसरून आपल्या मनमानीनुसार आपली मते मतदारांवर लादली जातील तेव्हा अपुऱ्या विचाराने मतदान करणाऱ्यांना हळूहळू जाणीव होत जाईल. लोकप्रतिनिधी म्हणून निवडलेले उमेदवार एसी गाड्यांतून फिरणार, मतदारांच्या नशिबी सार्वजनिक वाहनेही उपलब्ध होत नाहीत. या परिस्थितीत अल्पावधीत सुधारणा होईल असे मात्र वाटत नाही.



या निवडणुकीच्या प्रचारात सहभागी झाल्यास विद्यापीठ, महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शिस्तभंगाच्या कारवाईस सामोरे जावे लागणार आहे, अशा सूचनाही जाहीर झाल्या आहेत, त्याचप्रमाणे निवडणूक काळात उमेदवारांकडून केल्या जाणाऱ्या खर्चांची तीन वेळा तपासणी केली जाणार असल्याचे जाहीर होऊन त्याप्रमाणे वेळापत्रके जाहीर केली आहेत. अशा प्रकारच्या कडक आणि काटेकोर नियमांच्या चौकटीत केले जाणारे मतदान त्यातील किती नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल त्याच्या बातम्या औत्सुक्य वाढविणाऱ्या ठरतील, असे वाटते.

### वाचक विचार मंच

## कर्नाटक सरकारचा स्वागतार्ह निर्णय...

कर्नाटक राज्यातील पंचायतराज खात्याच्या आदेशावरून अमृत आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत महिन्यातून एक आरोग्य शिबिर भरवून त्या माध्यमातून मोफत बीपी, शुगर तपासणी करण्याची सूचना राज्यातील संबंधित ग्राम पंचायतींना दिल्याचे वृत्त आहे ते निश्चितच स्वागतार्ह म्हणावे लागेल, कारण सध्या बीपी व शुगरचे आजार झपाट्याने वाढत आहेत. या जिवघेण्या आजारांमुळे अनेक रुग्णांना मरणयातना भोगाव्या लागत आहेत. शरीरातील विविध अवयवांना यामुळे गंभीर इजा होऊन तो अवयव निकामी झाल्याने रुग्णाला मरणाशिवाय पर्याय उरत नाही हे वास्तव आहे. या शिबिरामुळे प्रत्येक गावातील बीपी, शुगरची आकडेवारी समोर येणार असून या आजारापासून सतर्क राहता येणार आहे. कर्नाटक सरकारने घेतलेला निर्णय अतिशय योग्य व माफक आहे. ग्राम पंचायतींना या अनुषंगाने आरोग्य किट देण्यात येत असून यामध्ये प्राथमिक आरोग्य तपासणीचे साहित्य आहे. बाल कल्याण विभाग सीडीपीओ व



आरोग्य खाते यांच्या पुढाकाराने महिन्यातून एकवेळ बीपी, शुगर तपासणी शिबिर घेऊन यामध्ये सहभागी होणाऱ्यांची मोफत तपासणी करण्यात येणार असून शिबिरासाठी लागणारी पूरक यंत्रणा आरोग्य विभाग देणार आहे. आरोग्य तपासणीचे निर्देश आधीपासून होते, पण त्यांची अंमलबजावणी होत नव्हती आता येथून पुढे वेळोवेळी आरोग्य विभागाला त्याचा अहवाल पाठवावा लागणार असल्याने आता प्रत्यक्षात अंमलबजावणी करावी लागणार आहे.

**राजू जाधव**
मांगूर, जि.बेळगांव

### धुमस

**भाराभर**

कधी नव्हे ते निवडणुकीत
यंदा चिक्कार झाले पक्ष
जे येतात ते म्हणतात
आमच्याकडे द्या तुम्ही लक्ष

कुणाला द्यावे मत
काही कळत नाही दादा
मावशी म्हणाली पेंद्या
आटा कम, फकीर ज्यादा

ज्यांना कडाडून विरोध केला
ते कसे गेले त्यांच्या पक्षात?
ज्यांनी काल घेतला घटस्फोट
ते आज त्यांच्याच शयनकक्षात

ह्यांच्या नावाचे कुंकू लावले
मंगळसूत्र त्यांचे बांधतात
ह्यांच्या नावाचा उखाणा घेऊन
त्यांच्या सोबत नांदतात

पतिव्रतेचा आव आणून
तेथे घुसते जेथे घबाड
त्या वारांगणेलाही लाज वाटावी
एवढे हे संधीसाधू नेते लबाड

**-ॲड. अनंत खेळकर**
अकोला


### संवाद

## अतिरेक्यांचे नापाक मनसुबे हाणून पाडा!

मागील काही काळापासून काश्मीर खोऱ्यात टार्गेट किलिंग, ग्रेनेड हल्ले, गोळीबार व चकमकीच्या घटनांनी उच्छाद मांडला आहे. त्यात काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून आपले काही जवानदेखील शहीद झाले आहेत. जम्मू-काश्मीरमधील जनतेला शांतता हवी आहे. हिंसेला ती कंटाळली आहे म्हणूनच त्यांनी भारतीय लोकशाहीवर विश्वास दाखवत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत हिरीरीने भाग घेतला. काश्मीरमध्ये शांततापूर्ण वातावरणात निवडणुका पार पडल्या, हे अतिरेक्यांना रुचले नसावे. काश्मीरमधील जनता भारताच्या मुख्य प्रवाहात येत आहे हे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांच्या पचनी पडणे शक्यच नव्हते म्हणूनच त्यांनी काश्मीर खोरे अशांत करून जनतेच्या मनात भीती निर्माण करण्यासाठी हा सारा उद्योग पुन्हा सुरू केला आहे. काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले करून काश्मीर पुन्हा अशांत करण्याचे अतिरेक्यांचे नापाक मनसुबे हाणून पाडले पाहिजेत. केंद्र सरकारने अतिरेक्यांचे हे नापाक मनसुबे हाणून पाडण्यासाठी कठोर पावले उचलायला हवीत. केंद्र सरकारने अतिरेक्यांना जशास तसे उत्तर द्यायला हवे. प्रसंगी पाकिस्तानमध्ये घुसून सर्जिकल स्ट्राईक करत अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याचा पर्यायदेखील खुला ठेवायला हवा. अतिरेक्यांच्या या नापाक मनसुब्याकडे दुर्लक्ष केले तर भारताला आणि काश्मिरी जनतेला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

**श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो.नं.-९९२२५४६२९५

### गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

## या बोटावरचा त्या बोटावर...

'आमच्या पक्षाचा जाहिरनामा वाचला काय बाबुराव?'

'काय म्हनते तुमचा पक्ष?'

'पक्ष म्हनते आमचं सरकार आल्यावर गावागावात सिमेंटचे रस्ते करु. शुद्ध पानी देऊ.. शेतमालाले भाव...'

'अरे कितीक वर्ष रस्ते अन् पान्यावर इलेक्शन लढवता? स्वातंत्र्य भेटून इतके वर्षे झाले तरी याच मुद्यावर इलेक्शन सुरू आहे. दुसरे मुद्दे नाहीत काय तुमच्यापाशी?'

'हेच मुद्दे महत्त्वाचे आहेत.'

'बस झालं.. काही नवीन सांगा.. एकच कॅसेट घासू नका.. प्रत्येक इलेक्शनले शेतमालाच्या भावाबद्दल राजकारन खेळल्या जाते. नेता गावात आला की याच विषयावर भाषण देते. फक्त इलेक्शनच्या टाईमले घोषना केल्या जातात अन् काहीच होत नाही'.

'लोकाईले याच मुलभूत सुविधाची गरज आहे.'

'त्या सुविधा कधीच पुऱ्या होत नाहीत, कारन की सुविधा पुऱ्या झाल्यावर तुमच्यापाशी मुद्दा राह्यत नाही. आजून पन्नास वर्षे तेच करत राह्यता काय? कराले बसलो तर पाच वर्षात कायापालट होते, पन तेवढी धमक नाही तुमच्यात.'

'मंग काय पाह्यजे तुमाले?'

'लेकरं डिगऱ्या घेऊन रिकामे फिरुन राह्यले.. दोन दोन वर्ष भरती होत नाही.. परीक्षेचे पेपर फुटतात.. हे दिसत नाही काय तुमाले?'

'आमचा पुरा जाहिरनामा वाचा.. सगळं हाय त्याच्यात.'

'मागच्या इलेक्शनले असाच जाहिरनामा होता.. काय केलं तुम्ही? या बोटावरचा थुका त्या बोटावर करत राह्यता.. झाला काय सरकारी दवाखाना? एक रस्ता बनवाले सात वर्षे लागतात..'

'विकास एका दिवसात होत असते काय? लोकसंख्या लय आहे भारताची.'


'मंग लोकसंख्या कमी करा.'

'ते माह्या हाती आहे काय? लोकाईनं पुढाकार घ्याले पाह्यजे'.

'कायदा करा.. दोनच्या वर लेकरं असनाराले आमदार होता येनार नाही.. आगुदर तुम्ही सुधरा मंग लोकं सुधरतीन.. खोके घेनं चालू.. पक्ष बदलनं चालू.. कितीक दिवस लोकाईले उल्लू बनवता?'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# १४ लाख रुपयांचा गोवा बनावटीचा मद्यसाठा जप्त



**कोल्हापूर** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर जिल्हा भरारी पथक क्रमांक १ कडून वाहनासह १४ लाख २८ हजार ६०० रुपयांचा गोवा बनावटीचा मद्यसाठा वाहनासह जप्त करण्यात आला आहे. यातील निव्वळ मद्याची किंमत ९ लाख ७८ हजार ६०० रुपये असल्याची माहिती कोल्हापूर राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाचे निरीक्षक एस.एम. मस्करे यांनी दिली आहे.

कोल्हापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक स्नेहलता श्रीकर- नरवणे व उपअधीक्षक युवराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा भरारी पथक क्रमांक १ ला राधानगरी- कोल्हापूर रोडवरून एका चारचाकी सिल्व्हर कलरच्या जेनिओ वाहनातून अवैध गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली.



**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या कोलकाता येथे स्पेशल टास्क फोर्सच्या मदतीने पोलिसांनी एका व्यक्तीला ताब्यात घेतले. मोहम्मद इस्माईल खान असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. त्यावर एसटीएफ आणि कोलकाता पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांना दिलेल्या नोटिसा मागे घेण्याचे आदेश

## राज्यातील वक्फ मालमत्तेचा वाद

**बेंगळुरू** : राज्यात वक्फ मालमत्तेचा वाद उफाळून निघाल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शेतकऱ्यांना आणि इतरांना दिलेल्या नोटिसा तात्काळ मागे घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार रविवारी अधिकृत सरकारी आदेश बाहेर पडला आहे. अनेक शेतकरी आणि इतर लोकांनी आपली मालमत्ता वक्फ बोर्डाच्या नावावर नोंदवण्यात आली आहे, अशी तक्रार केली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी फेरफार प्रक्रिया आणि शेतकऱ्यांना बजावलेल्या नोटिसा मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत.

शेतकऱ्यांच्या उताऱ्यातील जमिनीच्या बदलाबाबत यापूर्वीच बजावलेल्या नोटिसा तात्काळ मागे घ्याव्यात. तसेच शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनींना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये. बेकायदेशीररित्या आणि नोटीस न देता उताऱ्यात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती केल्यास ती तात्काळ रद्द करा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी दिल्या होत्या.

# वारंवार त्याच नेत्यांना निवडून देणे हानिकारक!


## राज ठाकरे यांचे मत

वृत्तसंस्था

**नवी मुंबई** : वारंवार त्याच नेत्यांना निवडून आणणे आणि सत्तेत राहणे हे महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी हानिकारक ठरू शकते. या गोष्टींमुळे राज्यात विकासाच्या संधी कमी होऊ शकतात. महाराष्ट्राची प्रगती आणि हितासाठी राजकीय पक्षांपेक्षा जनतेचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. कोणत्याही पक्षापेक्षा महाराष्ट्राचे भवितव्य अधिक महत्त्वाचे असून, त्यासाठी राजकीय जागरुकता असणे गरजेचे आहे, असे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. मुलाखतीदरम्यान त्यांनी सध्याच्या राजकीय वातावरणातील गोंधळ, सत्ता संघर्ष आणि पक्षांतरांवर स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली.

# सेंट फ्रान्सिस झेवियर शव प्रदर्शनाची तयारी!

## १५०० पोलीस कर्मचारी असतील तैनात



**पणजी** : जुने गोवे येथे होणाऱ्या सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या १७व्या शव प्रदर्शन सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. येथील कामाचा आयोजन समितीकडून दर दिवशी आढावा घेतला जात आहे. या भव्य सोहळ्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अंदाजे १५०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येणार आहे. आज सोमवारी गोव्याचे पोलीस महासंचालक तसेच सोहळ्याच्या आयोजन समितीने घेतलेल्या बैठकीत एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. १८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत चर्च परिसरात भेट देऊन सविस्तर आढावा घेतील अशी माहिती आयोजन समितीचे सदस्य फादर हेन्री फाल्काओ यांनी दिली.

# संविधानाने दिलेले अधिकार आदिवासींना देणार!

## मुख्यमंत्र्यांनी दिली हमी



**फोंडा** : सूर्य, चंद्र असेपर्यंत भारतीय संविधानाला कोणीही हात लावू शकत नाही. राज्याचा कारभार संविधानानुसारच चालेल. संविधानाने आदिवासी समाजाला दिलेले सर्व अधिकार मिळवून दिले जातील, अशी हमी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली.

'उटा' संघटनेच्या द्विदशकपूर्ती सोहळ्यानिमित्त फर्मागुडी-फोंडा येथे रविवारी आयोजित भव्य कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. मंत्री गोविंद गावडे, 'उटा'चे अध्यक्ष तथा माजी मंत्री प्रकाश वेळीप, आमदार आंतोन वाझ, अनुसूचित जमाती (एसटी) वित्त आणि विकास महामंडळाचे अध्यक्ष वासुदेव मेंग गावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# चीनने श्रीलंकेला केली ३० दशलक्ष रुपयांची मदत

वृत्तसंस्था




**कोलंबो** : या वर्षी जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी चीनने श्रीलंकेला ३० दशलक्ष रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. यासोबतच, प्रेसिडेंशियल मीडिया डिपार्टमेंटच्या निवेदनात म्हटले आहे की चीनकडून १० दशलक्ष युआन किमतीची भौतिक मदतदेखील अपेक्षित आहे, जी आपत्कालीन मानवतावादी सहाय्य कार्यक्रमांतर्गत दिली जाईल.

श्रीलंकेत या वर्षात दोनदा भीषण पूर आला होता, ज्यामध्ये २४ हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला होता आणि ५०,००० हून अधिक लोक बेघर झाले होते. या प्रकरणी पीएमडीने सांगितले की, चिनी आर्थिक मदतीची सुमारे ३० दशलक्ष रुपयांची रक्कम सरकारी तिजोरीत पाठवली आहे. यापूर्वी ३० ऑक्टोबर रोजी श्रीलंकेतील चिनी दूतावासाने पूर मदत म्हणून १,००,००० अमेरिकन डॉलर (सुमारे ३० दशलक्ष श्रीलंकन रुपये) आणि ४०० दशलक्ष श्रीलंकन रुपयांची मदत सामग्री राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांना दिली होती. याशिवाय, राष्ट्रीय अर्थसंकल्प विभागाने आपत्तींमुळे बाधित झालेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी संरक्षण मंत्रालयाला अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले आहे.

# ट्रम्प विरोधात पोस्ट करणाऱ्याने कुटुंबाला संपवले

## कुटुंबातील चार जणांना घातल्या गोळ्या

वृत्तसंस्था



**मिनेसोटा:** ट्रम्प यांच्या विजयाने अमेरिकेतील मिनेसोटा शहरात एक भयंकर प्रकार समोर आला आहे. अमेरिकेतील मिनेसोटा येथील डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात सोशल मीडियावर सतत पोस्ट करणाऱ्या अँथनी नेफ्यू याने कुटुंबातील चार सदस्यांची हत्या केली. यानंतर स्वतःचेही जीवन संपवले. त्याने आपल्या कुटुंबातील चार जणांना गोळ्या घालून ठार केले. हे प्रकरण ७ नोव्हेंबर रोजी उघडकीस आले. जेव्हा येथील घरातून मृतदेह सापडले.

स्थानिक पोलिसांनी म्हटले आहे की, आएरिन अब्रामसन आणि तिचा मुलगा जेकब यांचे मृतदेह सापडले. याशिवाय शेजारच्या दुसऱ्या अपार्टमेंटमधून पत्नी कॅथरीन नेफ्यू आणि त्याचा मुलगा ऑलिव्हर नेफ्यू यांचे मृतदेह सापडले आहेत. यानंतर पोलिसांना घरातच ४६ वर्षीय अँथनी नेफ्यू याचाही मृतदेहही मिळाला. त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलीस प्रमुख माईक सेनोव्हा यांनी सांगितले की, कुटुंबाचा खून करून आत्महत्या करणारा अँटोनी याने सोशल मीडियावर लागोपाठ अनेक पोस्ट केल्या होत्या, ज्यामध्ये त्यांनी डोनाल्ड ट्रम्प विरोधी विचार मांडले होते. जुलैमध्ये त्याने केलेल्या पोस्टमध्ये म्हटले होते की, माझे मानसिक आरोग्य आणि जग एकत्र शांतीत राहू शकत नाही. याचे कारण धर्म आहे. माझ्या कुटुंबावर लादल्या जात असलेल्या धार्मिक कट्टरवादाची मला भीती वाटते. सत्य बोलल्याबद्दल मला सुळावर चढवायला आवडे. खरे तर लोकांना वाटते की मी आणि माझी मुले ख्रिस्तविरोधी आहेत. एका पोस्टमध्ये त्याने रिपब्लिकन पक्षावर लिहिले होते की, या लोकांनी महिलांसाठी अडचणी निर्माण केल्या आहेत. त्यांना अशा नात्यातून बाहेर पडता येत नाही जिथे त्यांना छळाचा सामना करावा लागतो. दुसऱ्या एका पोस्टमध्ये त्याने बराक ओबामा, ट्रम्प, जो बायडेन आणि कमला हॅरिस यांचे फोटो शेअर केले होते.




## पोलिसांनी व्यापाऱ्याचे वाचवले लाखो रुपये

# भोपाळमध्ये डिजिटल अरेस्टचा प्रकार

वृत्तसंस्था

**भोपाळ** : देशात सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये गत काही महिन्यापासून मोठी वाढ झाली आहे. त्यातच 'डिजिटल अरेस्ट'च्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. आता भोपाळ पोलिसांनी एका व्यावसायिकाला डिजिटल अरेस्टमधून सोडवले तसेच त्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्यापासून वाचवले आहे. या संपूर्ण घटनेची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. सायबर गुन्हेगारांनी शनिवारी या व्यावसायिकाला फोन करून भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (TRAI) चे अधिकारी असल्याचे भासवत आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला.

समोर आलेल्या माहितीनुसार शनिवारी भोपाळच्या अरोरा कॉलनीत राहणाऱ्या विवेक ओबेरॉय यांना शनिवारी एक कॉल आला. कॉल करणाऱ्याने आपण ट्रायचे अधिकारी असल्याचे भासवले. पुढे कॉल करणाऱ्याने विवेकला 'तुमच्या नावे अनेक बँक खाती उघडण्यात आली असून आधार कार्डचा गैरवापर करत अनेक सिमकार्ड घेतली गेली आहेत तसेच आम्हाला तुमच्यावर मनी लॉन्ड्रिंगचा संशय' असल्याचे सांगितले. दरम्यान या अधिकाऱ्याने विवेकला स्काइप व्हिडिओ कॉलिंग ॲप डाऊनलोड करण्यास प्रवृत्त केले तसेच स्वतःला एका खोलीत बंद करण्यास सांगितले. दरम्यान रूममध्ये जाताना विवेकने खबरदारीचा उपाय म्हणून भोपाळच्या सायबर क्राइम अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली.


## हॅकर नव्या क्लुप्त्यांचा अवलंब करतात!

भोपाळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हेगारांना विवेकच्या बँकखात्याची माहिती मिळाली होती. मात्र, पैसे हस्तांतरण होणारच इतक्यात पोलिसांनी येथे पोहचून सगळे बनाव हाणून पाडला. लोकांना लुबाडण्यासाठी सायबर ठगोबा नेहमी नव्या क्लुप्त्यांचा अवलंब करतात. आता त्यांनी डिजिटल अरेस्ट यास आपले हत्यास बनवले आहे. ते प्रथम आपले सावज हेरतात. त्यांचा बॅकग्राऊंड चेक करतात. मग त्याला कॉल करत आपण अमुक तमुक खात्याचे अधिकारी असल्याचा बनाव रचत डिजिटल अरेस्टचे सवंग रचतात. याद्वारे आजवर देशात तब्बल १२०० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद आहे. मागील मन की बातच्या भागात देशाला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी याबाबत सावध राहण्याचे आवाहनदेखील केले होते.

# पंतप्रधान नेतान्याहूंचे बंकरमधून कामकाज

## इराणच्या हल्ल्याची केली भीती व्यक्त

वृत्तसंस्था



**इस्रायल** : इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू इराणच्या हल्ल्यामुळे घाबरले असल्याचे म्हटले जाते आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार नेतान्याहू हे पंतप्रधान कार्यालयाच्या तळघरातील स्ट्राँग रूममधून बहुतेक वेळा काम करत असल्याचे इस्रायली मीडियाच्या वृत्तात म्हटले आहे.

गेल्या महिन्यात सिझेरिया येथील त्यांच्या खाजगी निवासस्थानावर हिजबुल्लाहच्या ड्रोन हल्ल्यानंतर, त्यांना सुरक्षित तळघर-स्तरीय खोली वापरण्याची आणि पूर्वी ज्ञात असलेल्या नेहमीच्या ठिकाणांना भेट देणे टाळण्याची सूचना देण्यात आली होती. हिजबुल्लाहने १९ ऑक्टोबर रोजी ड्रोन डागले होते. त्यापैकी एकाचा सिझेरिया येथील नेतान्याहू यांच्या घराजवळ स्फोट झाला. ड्रोनने बेडरूमची खिडकी तोडली होती. मात्र, आतमध्ये प्रवेश करता आला नाही, त्यामुळे फारसे नुकसान झाले नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हल्ल्याच्या वेळी नेतान्याहू घरी नव्हते. हल्ल्याच्या भीतीमुळेच इस्त्रायलच्या कॅबिनेटच्या बैठकांचे वेगवेगळ्या ठिकाणी आयोजन केले जात असल्याच्या बातम्याही आहेत. यासोबतच नेतान्याहू यांचा मुलगा अवनर याचे २६ नोव्हेंबर रोजी होणारे लग्न पुढे ढकलण्यात आले आहे. पुढील महिन्यात जेरुसलेम जिल्हा न्यायालयात नेतान्याहू यांची साक्ष होणार होती.

# इराकमध्ये 9 वर्षीय मुलीसोबतही निकाह शक्य

## विवाह कायद्यात बदल करण्याच्या हालचाली

वृत्तसंस्था



**बगदाद** : इराकमध्ये विवाहासंदर्भातील वैयक्तिक कायद्यात बदल करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सुधारित कायद्यानुसार ९ वर्षीय मुलीसोबत निकाह करण्याची परवानगी मिळणार आहे. दरम्यान, पुरोगामी संघटनांनी प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध केला आहे.

प्रस्तावित कायद्यानुसार महिलांना तलाक देण्याचा हक्कही काढून घेण्यात येणार आहे. शिवाय, अपत्यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी पित्यावर सोपविण्यात येणार आहे. वारसा हक्कामधूनही महिलांना डावलण्यात येणार आहे. कौटुंबिक वाद उद्भवल्यास धार्मिक मंचावर अथवा न्यायिक पातळीवर कौटुंबिक वाद मिटवण्याची मुभा प्रस्तावित कायद्यात असणार आहे. इराकमध्ये शिया पंथीयांच्या पाठिंब्यावर कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारची स्थापना करण्यात आली आहे. मुलींच्या अनैतिक संबंधांना अटकाव घालण्यासाठी ९ वर्षांतच मुलींच्या विवाहास संमती सुधारित कायद्यात देण्यात येणार आहे. शरिया कायद्यानुसार मुलींचे चारित्र्य जपण्यासाठी सुधारित कायदा करण्यात येणार असल्याचे सरकारी सूत्रांचे म्हणणे आहे. सुधारित कायदा करण्यासाठी सप्टेंबर महिन्यात दुसऱ्यांदा घटनादुरुस्ती करण्यात आली आहे. लॉ १८८ असे सुधारित कायद्याचे नाव आहे. हा कायदा पश्चिम आशियातील देशांसाठी सुधारणावादी असणार असल्याचा दावा सरकारच्या वतीने करण्यात आला. दरम्यान, इराकमधील महिला संघटनांनी प्रस्तावित कायद्याला प्रखर विरोध केला आहे.

# सरन्यायमूर्ती खन्ना यांचा कार्यकाळ केवळ ६ महिन्यांचा

## १३ मे २०२५ रोजी होतील निवृत्त

**नवी दिल्ली** : सरन्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या सेवानिवृत्तीनंतर देशाचे ५१ वे सरन्यायमूर्ती न्या. संजीव शर्मा यांचा कार्यकाळ

अवघा ६ महिन्यांचा असणार आहे. आगामी १३ मे २०२५ रोजी ते सरन्यायमूर्ती पदावरून सेवानिवृत्त होतील. संजीव खन्ना यांचा वकिलीचा वारसा त्यांचे वडील देवराज खन्ना यांच्याकडून मिळाला. देवराज खन्ना दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहिले आहेत. तर संजीव खन्ना यांचे काका हंसराज खन्ना हे सर्वोच्च न्यायालयात सरन्यायमूर्ती होते. निवृत्त सरन्यायमूर्ती चंद्रचूड यांचा कार्यकाळ २ वर्षांचा होता. नवे सरन्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा कार्यकाळ केवळ ६ महिने असेल. आगामी १३ मे २०२५ रोजी ते सरन्यायमूर्ती पदावरून निवृत्त होतील. संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली.



**रामेश्वरम** : श्रीलंकन नौदलाने २३ भारतीय मच्छिमारांसह तीन ट्रॉलर्सही नौदलाने ताब्यात घेतले. मासेमारी करण्यासाठी श्रीलंकेच्या समुद्री हद्दीमध्ये प्रवेश केल्यामुळे ही कारवाई झाल्याचे मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. मच्छीमारांना श्रीलंकेतील कानकेसंथुराई बंदरात नेण्यात आले आहे.

# बांगलादेशातील वातावरण पुन्हा तापले

**ढाका** : बांगलादेशात सत्तापालट झाल्यापासून सातत्याने तणावाची स्थिती आहे. माजी पंतप्रधान शेख हसिना यांनी बांगलादेशातून बाहेर पडत भारतात आश्रय घेतल्याच्या तीन महिन्यांनी त्यांचा पक्ष अवामी लीगने रविवारी ढाका येथे वर्तमान अंतरिम सरकारच्या विरोधात निदर्शने केली आहेत. या पार्श्वभूमीवर अंतरिम युनूस सरकारने सैन्याला रस्त्यांवर उतरविले आहे. तर दुसरीकडे ढाक्यात अवामी लीगचे कार्यकर्ते आणि समर्थकांवर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. बांगलादेशच्या सैन्याने निदर्शनांच्या पूर्वीच शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. पक्ष समर्थक आणि भूमिगत झालेले नेते ढाक्यातील गुलिस्तान, झीरो पॉइंट, नूर हुसैन चौक परिसरात जमा झाले. स्वतःच्या नेत्यांना चुकीच्या पद्धतीने गोवणे, विद्यार्थी शाखेवर बंदी घालण्याच्या आणि कार्यकर्त्यांची होत असलेल्या छळवणुकीच्या विरोधात अवामी लीगकडून ही निदर्शने करण्यात आली आहेत.

# दिल्लीत डेंग्यूने केला कहर

## गेल्या आठवड्यात आढळले ४७२ रुग्ण

**नवी दिल्ली** : देशाची राजधानी दिल्लीत डेंग्यूच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. गेल्या आठवडाभरात डेंग्यूचे ४७२ रुग्ण आढळले आहेत. तसेच यावर्षी डेंग्यूमुळे आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. या वर्षात आतापर्यंत एकूण ४५३३ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. दिल्ली महापालिकेने ही माहिती दिली आहे. डेंग्यू हा आजार डासांच्या चावण्याने पसरतो. या आजारात शरीरातून प्लेटलेट्स झपाट्याने कमी होतात, त्यामुळे रुग्णाची प्रकृती बिघडते आणि त्याला रुग्णालयात दाखल करावे लागते. जेव्हा रुग्ण गंभीर स्थितीत पोहोचतो तेव्हा त्याचा मृत्यू होतो.

# विमानतळांवर इकॉनॉमी झोन होणार अनिवार्य

वृत्तसंस्था

नवी दिल्ली: भारतीय विमान प्राधिकरणाने विमानतळावर इकॉनॉमी झोन अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक विमानतळावर काही जागा इकॉनॉमी झोन म्हणून राखीव असेल. जेथे प्रवाशांना स्वस्त दरात खाद्यपदार्थ खरेदी करता येतील. यासंदर्भात विमान प्राधिकरण अधिकाऱ्याने सांगितले की, या ठिकाणी खाद्यपदार्थ सुमारे ६० ते ७० टक्के स्वस्तात मिळतील. सध्या विमानतळावर एका चहाची किंमत १२५ ते २०० रुपये आहे; परंतु इकॉनॉमी झोनमध्ये केवळ ५० ते ६० रुपये असेल. मात्र, या इकॉनॉमिक झोन मध्ये सेवा आणि खाद्यपदार्थांच्या प्रमाणामध्ये फरक असेल. म्हणजे बसण्याऐवजी उभे राहण्यासाठी टेबल असतील. चहा लहान कप किंवा ग्लोसेसमध्ये दिला जाईल. पूर्ण जेवणाऐवजी मर्यादित जेवण असेल. पॅकिंगच्या मूलभूत गुणवत्तेत खाद्य पदार्थ उपलब्ध असतील.

येथे परवडणाऱ्या दरात ६ ते ७ खाद्यपदार्थ दुकाने उघडतील अशी माहिती विमानतळ प्राधिकरणातील सूत्रांनी दिली. नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांनी गेल्या दोन महिन्यांत ही समस्या सोडवण्यासाठी ३ बैठकी घेतल्या. यामध्ये भारताचे विमान प्राधिकरण, विमानतळ ऑपरेटिंग कंपनी आणि विमानतळावर खाण्यापिण्याची दुकाने चालवणाऱ्या कंपन्यांचा समावेश होता.

### इकॉनॉमी झोनमध्ये खाण्यापिण्याची सुविधा

सध्याच्या विमानतळावरील देशांतर्गत उड्डाण क्षेत्रातही असे झोन तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की इकॉनॉमी झोनमध्ये फक्त खाण्यापिण्याची सुविधा उपलब्ध असेल सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या परवडणाऱ्या झोनच्या क्षेत्राबाबत अद्याप कोणतेही नियम ठरलेले नाहीत.

### किफायतशीर दरात मिळणार खाद्यपदार्थ



# केंद्राने भंगारातून कमावले ६५० कोटी रुपये

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली** : नुकत्याच पार पडलेल्या स्वच्छता मोहिमेदरम्यान केंद्राने भंगाराची विल्हेवाट लावत ६५० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली, असे शनिवारी जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. २०२१-२४ पासून सरकारने राबवलेल्या विशेष मोहिमांमुळे भंगाराच्या विल्हेवाटीच्या माध्यमातून २,३६४ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे.

# एकजूटनेच विजयाचा गुलाल लागेल!

## संदीप क्षीरसागर यांना विजयी करा

## खा.बजरंग सोनवणे, जीवनराव गोरेंचे आवाहन

## राजेंद्र मस्केंकडून आयोजित बैठकीत विश्वास

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आ. संदीप भैय्या म्हणजे बीड मतदार संघातील जनतेचा खरा निष्ठावंत आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी आहे. पक्ष अडचणीत असतानाही संदीप भैय्या यांनी पवार साहेबांची साथ सोडली नाही. अशा स्वाभिमानी लोकप्रतिनिधीला पुन्हा एकदा बीड मतदार संघातून आमदार म्हणून निवडून द्या असे आवाहन जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे व पक्षाचे ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी केले.तर या विधानसभा निवडणुकीत आपण सर्व सहकारी एकत्र आलो आहोत. आपली ही एकजूटच आपल्याला विजयाकडे घेऊन जाणार आहे असा विश्वास आमदार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.



राष्ट्रवादी परिवारातील सहकारी, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मंगळवारी (दि.१२) शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जेष्ठ नेते जीवनराव गोरे, खासदार बजरंग सोनवणे व इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी संवाद साधताना आ.संदीप क्षीरसागर म्हणाले, बीड मतदारसंघात माजी विरोधक मला एकत्र येऊन घेरण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु त्यांचे हे प्रयत्न सफल होणार नाहीत, कारण बीड मतदार संघातील जनता आपल्या सर्वांसोबत आहे. पान २ वर...

### मतदारांनीच संदीप भैय्यांची निवडणूक हाती घेतली-मस्के

आ.संदीप क्षीरसागर हे कायम जनतेत राहून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी काम करत असतात. पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांना न्याय देण्यासाठी आहे. त्यामुळे मतदार संघातील मतदार आपल्या सोबत आहेत. सर्व घटकांना विकास कामे पूर्ण करत न्याय देण्याचे काम संदीप भैय्यांनी केले आहे. म्हणूनच बीड विधानसभा मतदार संघातील मतदारांनीच संदीप भैय्यांची निवडणूक हाती घेतली असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला.

# दिंद्रुडमध्ये कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

## सावकाराच्या जाचास कंटाळून जिवन संपविले

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

खासगी सावकरांकडून घेतलेले कर्ज भेटत नसल्याने हतबल झालेल्या

कर्जबाजारी शेतकऱ्याने गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली. सदरील घटना माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे सोमवारी सकाळी उघडकीस आली. माजलगाव येथील सरकारी दवाखान्यात शिवविच्छेदन झाल्यानंतर मयतावर सायंकाळी सातच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. अवघ्या ४२ वर्षाच्या वयात केलेल्या आत्महत्या मुळे ठोंबरे कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.



याबाबत अधिकृत असे की, दिंद्रुड येथील रहिवासी असलेले काशिनाथ किसन ठोंबरे हे मागील काही दिवसांपासून कर्जबाजारी झाले होते. निसर्ग साथ देत नाही त्यातच शेतीमालालाही भाव नाहीत. मग घेतलेले कर्ज कसे फेडायचे? या विवंचनेत असलेल्या ठोंबरे यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली ची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. घटनेचे वृत्त समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रीतसर पान २ वर...

# अनिलदादा जगतापांचा शिवसेनेला जय महाराष्ट्र

## पत्रकार परिषद:जिल्हाप्रमुख पदाचा दिला राजीनामा!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांपासून मी प्रामाणिकतेने आणि निष्ठेने शिवसेनेत सक्रिय असून शिवसेनेच्या माध्यमातून मी जनसेवा करत आलो आहे, सर्वसामान्यांचे समस्या अडचणी सोडवत आलो आहे. परंतु वारंवार शिवसेनेने माझ्यावर अन्याय करत मला डावलले आहे. जेंव्हाही विधानसभा निवडणुकीची तयारी केली तेंव्हा तेंव्हा मला सोडून उमेदवारीची माळ दुसऱ्याच्या गळ्यात घालण्यात आली. बीडमधील अठरा पगड जाती धर्मातील जनसमुदाय माझ्याजवळ येऊन वारंवार दुःख व्यक्त करतो की, सातत्याने शिवसेनेकडून अन्याय तुमच्यावर होतो तरी तुम्ही का हा अन्याय सहन करतात? पण आता बस्स, मी वैतागलोय या अन्यायाला. आता सहन होत नाही. त्यामुळे मी आणि माझे सर्व सहकारी पदाधिकारी शिवसेनेला कायमचा पान २ वर...

# नमीता लोखंडेंचे दुकान होणार बुश!

## चर्चा:सासुबाईनी आणलेल्या सबस्टेशनकडे सुनबाईचे दुर्लक्ष

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळीचे सबस्टेशन स्वीर्गीय विमला ताईसाहेब मुंदडा यांनी आरोग्य मंत्री असताना चिंचोलीचे सबस्टेशन स्थापन केले आहे स्वर्गीय विमल ताईसाहेब मुंदडा यांची ही देणगी चिंचोली माळीचे नागरिका कधीही विसरणार नाही परंतु विद्यमान आमदार स्वर्गीय विमल ताईसाहेब मुंदडा यांचे नाव घेऊन, विचार धारा घेऊन निवडुन आल्या आहे आज त्यांचा वारसा चालवण्यात विद्यमान आमदार सपशेल फेल आहेत हे आज एकदा चिंचोली माळी सबस्टेशनच्या दुरअवस्थे मुळे चिंचोली माळी येथील नागरिकांनी भावना व्यक्त केल्या तरी चिंचोली माळी सबस्टेशनची दुरअवस्था आहे हे विद्यमान आमदारांना लोकप्रतिनिधी म्हणून दीसत नाही का विद्यमान आमदारांनी चिंचोली माळी येथील जनतेचे मत घेतले नाहीत आमदार झाल्या पासून चिंचोली माळी कडे दुर्लक्ष केले जसे काय चिंचोली माळी त्यांच्या मतदार संघात नाहीच .असे तर नाही विद्यमान आमदारांना स्वर्गीय विमल ताईसाहेब मुंदडा यांची ऑलर्जी तर नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे



कारण स्वर्गीय विमल ताईसाहेब मुंदडा यांच्या साठी चिंचोली माळी गाव त्यांचे स्वताचे गाव असल्या सारखा विकास केला होता परंतु विद्यमान आमदारांनी आमदार झाल्या पासून चिंचोली माळीला तोंड सुध्दा दाखवले नाही त्यामुळे सासुबाई ची व सासुबाईनी केलेल्या कामाची विद्यमान आमदारांना ऑलर्जी आहे की काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण चिंचोली माळी येथील सबस्टेशन स्वीर्गीय विमला ताईसाहेब मुंदडा यांनी स्थापन केले मंजूर केले परंतु विमल ताईसाहेब मुंदडा यांच्या नंतर चिंचोली सबस्टेशन कडे कुनी पाहीले सुध्दा नाही आज पहायला गेलो तर चिंचोली माळी सबस्टेशनची दुरअवस्था अशी झाली आहे की ऐक शोभेची वस्तू असल्या सारखी असुन खोळंबा नसुन वळींबा अशी अवस्था चिंचोली सबस्टेशनची झाली आहे व अनेक वर्षांपासून चिंचोली माळी सबस्टेशनच्या दुरअवस्थे बद्दल लोकप्रतिनिधी संमंधीत प्रशासनाला कळले जात आहे तरी सुद्धा विद्यमान आमदार यांनी त्यांच्या विधानसभा आंतराकीप्रश्ना मध्ये मांडले का नाही असा प्रश्न पान २ वर...



# केजमध्ये वाळु माफियांचा धुमाकूळ!

## दुर्लक्ष: ट्रॅक्टर जेसीबी सहाय्याने वाळू उपसा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोरगाव - काळेगाव नदी परिसरामध्ये मध्ये वाळू माफियांचा धुमाकूळ सुरु आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव या परिसरामध्ये नदीपात्रात मध्ये रोज रात्रीच्या वेळी वाळू माफिया हजारो ब्रश वाळू उपसा करतात. नदीपात्रातून वाळू माफिया वाळूची ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची हजारो ब्रास वाळू उपसा चोरी करत आहे उत्रेश्वर पींप्री व बोरगाव नदीपात्रामध्ये एक ते दीड - खोलीचे खड्डे पडले आहे. खोल खड्डे पडल्यामुळे शेतकऱ्याच्या विहिरीच्या पाण्याची पातळी खोल गेली आहे. यामुळे भविष्यामध्ये शेतकऱ्याला पिण्याचे पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी हवाल दिल झाला आहे. त्यामधून वाळू माफियाना हजारो पान २ वर...



**परळी:** येथील प्रभाग क्रमांक ७ व ८ मधील युवा कार्यकर्ते सय्यद साजेद सय्यद इब्राहिम उर्फ बबलू, शेख जुबेर शेख लालामिया आदी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. या प्रसंगी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते सुनील गुट्टे, डॉ. दुष्यंत देशमुख, कॉँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुरभाई, राशप पक्षाचे परळी शहराध्यक्ष जीवनराव देशमुख आदी.

# कुटुंबाच्या पलीकडे सत्ता जाऊच दिली नाही

## प्रा.सुरेश नवले : जनता क्षीरसागरांना घरी बसविणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



काल रोजी जयदत्त क्षीरसागर यांनी विधानसभा निवडणुकीच्या आईन टप्प्यात स्वतःचा पुतण्या योगेश क्षीरसागर यास पाठिंबा देत त्यांना विधानसभा निवडणुकीत निवडून आणा असे आवाहन केले. बीड विधानसभा मतदार संघ हा आपल्या कुटूंबाच्याच ताब्यात राहिला पाहिजे असाच प्रयत्न जयदत्त क्षीरसागरांचा राहिला आहे. गत २०१९ विधानसभा निवडणुकीमध्ये जयदत्त क्षीरसागर शिवसेनेचे उमेदवार होते. त्यावेळी अनिल जगताप यांनी त्यांचा प्रचार केला होता. खरं तर थोडी जरी त्यांना उपकारांची जाणीव असती तर त्यांनी अनिल जगतापांना पाठिंबा दिला असता परंतू आयुष्यभर त्यांनी बहुजनांचा द्वेषच केलेला आहे. जातीच्या पलिकडे त्यांची पान २ वर...

# परळीत नक्कीच परिवर्तन घडवून येईल!

## पडघम:राजेसाहेब देशमुखांच्या प्रचारार्थ रॅली

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्ष, कॉँग्रेस, शिवसेना, उबाटा, महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी शहरात दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी परळी शहरात माणिक नगर, नाथ नगर, गुरुकृपानगर, स्वाती नगर, शिवाजी नगर, पॉवर लुम सोसायटी येथे ठीक ठिकाणी प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीस मतदार बंधू भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.



सर्वच प्रभागात ठिकठिकाणी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी, परळी शहरातील वातावरण भयमुक्त करण्यासाठी मतदान करावे असे आवाहन महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदार बंधू-भगिनींना केले. राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, परळी शहर कॉँग्रेस चे सर्व पदाधिकारी महिला आघाडी, युवक कॉँग्रेस, सर्व सेल, सर्व फ्रंटचे कार्यकर्ते यांनी दि.१२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. माणिक नगर, नाथ नगर, गुरुकृपानगर, स्वाती नगर, शिवाजी नगर, पॉवर लुम पान २ वर...

चर्चा काही पण शक्कल लढवली तरी पराभव अटळ

# स्वत:ला समजू लागल्या झाशीची राणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या केज विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण तापले आहे नमिता मुंदडा व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मागील चार दिवसा पूर्वी एक विडीओ सोशल मीडियावर टाकला होता त्यामध्ये झाशीची राणी सारखे नमिता मुंदडा यांनी दोन महिन्यांच्या बाळाला घरी ठेवून मतदारसंघाचे प्रश्न सोडवले आणि नमिता मुंदडा यांना झाशीच्या राणीची पदवी दिली अहो नमिता मुंदडा तुम्ही आलिशान गाड्यांमध्ये फिरता तुम्ही तुमच्या राजकीय स्वतःच्या फायद्यासाठी असं काही करु नका एकीकडे आमच्य ऊसतोड कामगार महिला रात्रंदिवस काबाड कष्ट करतात त्यांचे हाल कधी कोणी बघितले जात



नाही तुम्ही एक वेळी तरी त्या ऊसतोड कामगार महिलांचे हाल बघा काय आहेत ते मग कळेल तुम्हाला खरी झाशीची राणी कोण आहे आठ दिवसाचा मूल पाचटा मध्ये घेऊन ऊस तोडणारी महिला एकीकडे आणि तुम्ही आलिशान गाड्यांमध्ये फिरणाऱ्या आमदार तुमची आणि ऊसतोड कामगार महिलांची कशी तुलना होणार जरी तुमची मुलं तुम्ही घरी ठेवली असली तरी ती फक्त तुम्ही तुमच्या राजकीय स्वार्थासाठी ठेवलेली आहे कि न जनतेच्या कोणाला कोणत्या कामासाठी आता शिक तर तुमची पहिली आमदारकीची टर्म संपत आहे एक वेळी तुम्ही आमदार झाला की मी स्वतः ला झाशीची राणी पान २ वर...

# वैद्यनाथ कारखाना पून्हा सुरु होणार

## पंकजा मुंडे:१४ तारखेला रोलर पूजन



अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आज झालेल्या प्रचार सभेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गोड बातमी दिली. वैद्यनाथ साखर कारखाना यंदा सुरू होणार असून येत्या गुरूवारी १४ तारखेला कारखान्यात रोलर पूजन होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

केज विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ आज अंबाजोगाई येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केलेल्या भाषणात आ.पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांना एक गोड बातमी देत असल्याचे सांगितले. आता तुम्ही ऊसाची चिंता करू नका. वैद्यनाथ कारखान्याचा डीआरटी मधून निर्णय पान २ वर...